वाहण्यात आला.

# भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. गादेकर


**बार्शी :** श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. मनोज गादेकर यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी डॉ. एच.एस. पाटील यांचा व नूतन प्राचार्य गादेकर यांचा सन्मान कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा संस्थेच्या खजिनदार वर्षा ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्रभारी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एच.एस. पाटील यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

Scanned with CamScanner

१



दिल्यानतर सूरज नवल बाबरे उर्फ कला.



बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या खजिनदार

आदरणीय

# सौ. वर्षाताई गुलाबराव ठोंबरे

यांना वाढदिवसाच्या

## हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक -

**श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी**

वरिष्ठ, कनिष्ठ, किमान कौशल्य, बी.सी.ए., बी.बी.ए.

विभागातील

**प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद**

Scanned with CamScanner

सकाळ TODAY
सोलापूर, गुरुवार, २९ जुलै २०२१ ३

# सोलापूर

## अवती भवती



**मळेगाव (ता. बार्शी) : डॉ. मनोज गादेकर यांचा सत्कार करताना तात्यासाहेब घावटे, अशोक माळी, ग्रंथालय विभागाचे सुरेश दराडे.**

# झाडबुके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांचा सत्कार

**मळेगाव :** मळेगाव (ता. बार्शी) येथे श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे नूतन प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांचा श्री शिवाजी तरुण कला व क्रीडा बहुउद्देशिय मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे तात्यासाहेब घावटे, अशोक माळी, ग्रंथालय विभागाचे सुरेश दराडे, चंद्रकांत मुंबरे उपस्थित होते. विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून मळेगाव येथे केलेल्या विविध सामाजिक कामामधून गावचे व महाविद्यालयाचे एक कौटुंबिक नाते तयार झाले आहे. मळेगावचे वैभव वाढविण्यात महाविद्यालयाचे देखील विशेष योगदान आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांनी भेट देऊन कामाचे कौतुक केले होते. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. गादेकर यांची निवड झाल्याबद्दल मळेगाव ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

Scanned with CamScanner

# मोफत जेसीबी ऑपरेटर प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा

## तहसीलदार सुनील शेरखाने यांचे नागरिकांना आवाहन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

पुरी येथील जेसीबी ऑपरेटर ट्रेनिंग सेंटरचा मोफत प्रशिक्षण देण्याचा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद असून, नागरिकांनी पुरी येथील मोफत जेसीबी ऑपरेटर प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सुनील शेरखाने यांनी केले. ते पुरी येथील पॉलिटेक्निक कॉलेजवर आयोजित ट्रेनिंग सेंटरच्या प्रारंभाप्रसंगी बोलत होते. सिम्युलेटर वर्गाचा प्रारंभ पांगरीचे सहायक पोलिस निरीक्षक सुधीर तोरडमल यांच्या हस्ते झाला.

यावेळी तहसीलदार शेरखाने यांनी या उपक्रमाचे कौतुक करून महाराष्ट्रातील या एकमेव केंद्राचा लाभ घ्यावा, जी काही प्रशासकीय मदत लागेल, ती देण्याची ग्वाही दिली.



बार्शी : पुरी येथील जेसीबी ऑपरेटर प्रशिक्षणाच्या प्रारंभाप्रसंगी तहसीलदार सुनील शेरखाने, सुनील तोरडमल, वर्षा ठोंबरे व इतर.

सहायक पोलिस निरीक्षक तोरडमल यांनी ग्रामीण भागातील प्रशिक्षण केंद्र हे राज्यस्तरावरील प्रमुख केंद्र व्हावे व प्रशिक्षणार्थींनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे मत व्यक्त केले.

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी नवोउपक्रम कसा आणला व यशस्वी केला, याविषयी माहिती सांगितली. तसेच सामाजिक बांधिलकी व वास्तवाचे भान ठेवून संस्थेने मोफत प्रशिक्षण देण्याचे ठरविले. यामुळे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटेल. तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा. पांगरी गणाची ओळख जेसीबी ऑपरेटरचा परगणा म्हणून व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. प्रास्ताविकात हमीद काजी यांनी ग्रामीण भागातील तरुणांनी, बेरोजगारांनी तसेच कोरोनामुळे रोजगार गेलेल्या लोकांनी जेसीबी मशिन ऑपरेटर प्रशिक्षणाचा लाभ घेऊन उज्ज्वल भविष्य घडवावे, असे मत व्यक्त केले. आभार तात्या घावटे यांनी मानले, तर सूत्रसंचालन मंगेश कांबळे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य प्रमोद गिलबिले, प्रा. सुमित वाघमारे, प्रा. सोमेश्वर शेटे यांनी परिश्रम घेतले. यावेळी पहिल्या बॅचचे विद्यार्थी, पॉलिटेक्निक कॉलेज, डी फार्मसी कॉलेज आणि भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शीचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

Scanned with CamScanner

२ पुढारी शहर-जिल्हा सोलापूर, रविवार, १५ ऑगस्ट २०२१

# झाडबुके महाविद्यालयात डॉ. रंगनाथन जयंती साजरी

बार्शी : पुढारी वृत्तसेवा

बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करून जयंती व देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त ग्रंथालय विभागाच्या वतीने कला, साहित्य, संस्कृती, संवर्धन विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त ३३ कला प्रकाराच्या स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. या ऑनलाईन स्पर्धा घेऊन त्यातून निवडक विद्यार्थ्यांना ऑगस्ट महिन्यात बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनीही डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ए.ए. जेवळीकर यांनी केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एन.आर. दणाणे



बार्शी : झाडबुके महाविद्यालयात डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

यांनी ग्रंथालयाचे महत्त्व सांगून प्रत्येक घरात ग्रंथालय असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यात ग्रंथालयाची भूमिका यावर आपले विचार मांडले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए.डी. सुर्वे यांनी ग्रंथालय विभागाच्या वतीने घेण्यात आलेली डॉ. एस.आर. रंगनाथन यांची जयंती व देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त ज्या स्पर्धा घेण्यात आलेल्या आहेत त्याबाबत ग्रंथालय विभागाचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी प्रा. एस.आर. खराडे, प्रा. मुलाणी, प्रा.बी.ए. करडे, प्रा.एस.बी. रणदिवे, प्रा. आर.व्ही. जाधव, प्रा. वाय.आर. घेवारे, प्रा. एस.एम. उबाळे, प्रा. पी.जी. माने उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश दराडे यांनी, तर विक्रम सुरवसे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात राष्ट्रीय पोषण आहार सप्ताह उत्साहात

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत 'राष्ट्रीय पोषण सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. पोषण सप्ताहाचा भाग म्हणून 'पौष्टिक आहाराचे जीवनातील महत्त्व' या विषयावर शारीरिक शिक्षण संचालक डॉ. जे. पी. झाडबुके यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रा. एम.डी कांबळे होते.

डॉ. जगदीश झाडबुके यांनी, कार्बोहायड्रेट्स, विटामिन प्रोटीन यांचे आहारातील महत्त्व सांगितले. तसेच साखर, मीठ, मैदा या गोष्टींपासून दूर राहण्याचा सल्ला दिला. तारुण्य व प्रौढ वयातील आहाराचा कार्यक्षमतेवर कसा परिणाम होतो, याचे विश्लेषणही त्यांनी केले.

अध्यक्ष एम.डी. कांबळे यांनी व्यायाम व सकस आहार यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रास्ताविक डॉ. पी.एस. गांधी, सूत्रसंचालन प्रा. के. टी. वन्हहुवे, तर आभार प्रदर्शन डॉ. एस. आर. मुळे यांनी केले. कार्यक्रमास आयक्यूएसी कॉर्डिनेटर डॉ. जी. आर. काशीद, प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी सोलापूर, रविवार, ०३ ऑक्टोबर २०२१

# भाऊसाहेब झाडबुके स्मृती ऑनलाइन व्याख्यानमालेत विविध विषयांवर मंथन

प्रतिनिधी | बार्शी

कै. नगरभूषण श्रीमान भाऊसाहेब झाडबुके स्मृती ऑनलाइन व्याख्यानमालेत शिक्षण, स्त्रियांचे प्रश्न, समाजमाध्यमे या विषयांवर मंथन झाले. संबंधित विषयातील तज्ञ व्याख्यात्यांनी मौल्यवान विचार व्यक्त करत मार्गदर्शन केले. बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या तीन दिवसीय ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. मंगळवार, बुधवार व गुरुवार अशी तीन दिवस ही व्याख्यानमाला झाली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सहायक प्राध्यापक डॉ. महेश जोशी यांनी 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि शिक्षण' याविषयावर पहिले पुष्प गुंफताना प्रामुख्याने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवादरम्यान झालेला आपला शिक्षण विषयक प्रवास अधोरेखित करताना शिक्षणातील सकारात्मक, गुणात्मक, संख्यात्मक बदला बरोबरच मानवतेच्या हेतूने वंचित, शोषित व स्त्री-पुरुष समानतेच्या पातळीवर झालेल्या सकारात्मक व जमेच्या प्रवासाचा आढावा घेतला. त्याच बरोबर शिक्षण विषयक प्रवासात काही उणीवा आणि समस्या राहून गेल्याची खंतही व्यक्त केली. एकूणच स्वातंत्र्याचे मूल्य प्रस्थापित करण्यासाठी आणि स्वातंत्र्याचे अमृतत्व टिकवण्यासाठी शिक्षण खूप महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे अजूनही शिक्षणामध्ये आमूलाग्र बदलाची गरज आहे, त्यासाठी शिक्षणाकडे पाहण्याचा सर्जनशील दृष्टिकोन आणि शिक्षण विषयक जाणीव, जागृती बाळगण्याचे आवाहन डॉ. महेश जोशी यांनी केले.

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि स्त्रियांचे प्रश्न या विषयावर दुसरे विचार पुष्प गुंफताना बार्शीच्या सुकन्या व छत्तीसगड येथील जिल्हा रुग्णालयाच्या स्त्री रोगतज्ञ डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांनी प्रामुख्याने आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याचे, शिक्षणाचे, त्यांच्या मूलभूत न्याय हक्कांचे वास्तव आणि विदारक स्वानुभव मांडले. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही आदिवासी स्त्रियांच्या मूलभूत समस्या व प्रश्न सुटले नसल्याची खंत डॉ. रेवडकर यांनी व्यक्त केली.

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि समाजमाध्यमे' या विषयावर तिसरे विचार पुष्प ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांनी गुंफले. प्रारंभी डॉ. जगदीश झाडबुके यांनी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक नगरभूषण श्रीमान भाऊसाहेब झाडबुके यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय कार्याचा गौरव केला. तीन दिवसीय व्याख्यानमालेत अनुक्रमे डॉ. जगदीश झाडबुके, प्रा. डॉ. नवनाथ दणाणे, माजी प्राचार्य शिवपुत्र धुत्तरगाव यांनी अध्यक्षपद भूषवले.

व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कोषाध्यक्ष वर्षा ठोबरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज गादेकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. गिरीश काशिद, व्याख्यानमालेचे संयोजक प्रा. डॉ. नवनाथ दणाणे, माहिती तंत्रज्ञान समन्वयक प्रा. डॉ. वैभव वाघमारे, प्रा. अतुल ढवळे, प्रा. डॉ. राजकुमार मोहिते, प्रा डॉ. पुष्कर गांधी यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

# आदिवासी स्त्रियांच्या मूलभूत समस्या आजही तशाच : डॉ. रेवडकर

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

आपण एकीकडे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना दुसरीकडे आपल्याच देशातील आदिवासी बहुल भागातील स्त्रियांचे प्रश्न किती गंभीर आहेत, याचे अनुभव कथन करताना स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही आदिवासी स्त्रियांच्या मूलभूत समस्या व प्रश्न सुटले नसल्याची खंत डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांनी व्यक्त केली.

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्ताने आयोजित नगरभूषण श्रीमान भाऊसाहेब झाडबुके स्मृती व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. बार्शीच्या सुकन्या डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांनी प्रामुख्याने आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याचे, शिक्षणाचे, त्यांच्या मूलभूत न्याय हक्कांचे वास्तव आणि विदारक स्वानुभव मांडले. आपल्या संवेदनशील मनाला जाणवलेले आदिवासी स्त्रियांचे अनेक गंभीर प्रश्न व त्यासंबंधीचे अंगावर शहारे आणणारे अनुभव त्यांनी कथन केले. छत्तीसगडमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून सध्या करीत असलेल्या आदिवासी स्त्रियांच्या आरोग्य जागृती व उपाययोजनांविषयीही माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. पुष्कर गांधी, तर प्रा. अतुल ढवळे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात रासेयो सप्ताह

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान कार्य प्रसिद्धी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. २४ सप्टेंबर रोजी कार्य प्रसिद्धी व सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवशी आपला परिसर स्वच्छ करून त्याचे छायाचित्र ग्रुपवर सामायिक केले. २५ सप्टेंबर रोजी गाडगे महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित ऑनलाईन प्रश्नावली स्पर्धा घेण्यात आली. जेणेकरून गाडगे बाबांचा जीवन परिचय नव्या पिढीला व्हावा. २६ सप्टेंबर रोजी वृक्षारोपण कार्यक्रम, २७ सप्टेंबर रोजी फुलांची रचना सजावट स्पर्धा आणि २८ सप्टेंबर रोजी रांगोळी स्पर्धा व २९ सप्टेंबर रोजी महात्मा गांधी जीवन कार्य छायाचित्र आधारित वर्णन स्पर्धा, ३० सप्टेंबर रोजी फुलांचे छायाचित्रीकरण स्पर्धा आणि १ ऑक्टोबरच्या दिवशी संत गाडगेबाबा महाराज जीवनकार्य चित्र आधारित वर्णन स्पर्धा इत्यादी अभिनव स्पर्धांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या सर्व स्पर्धे साठी मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विशाल लिंगायत होते. यावेळी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. गिरीश काशीद उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. व्याख्यानाचे सूत्रसंचालन प्रा. के. टी. व्हनहुवे आणि प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पुष्कर गांधी आणि आभार डॉ.एस. आर. मुळे यांनी केले. या राष्ट्रीय सेवा योजना प्रसिद्धी सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्य प्रसिद्धी सप्ताह यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर आणि डॉ. गिरीश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.एस. गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, डॉ. एस. आर. मुळे आणि सुरेश दराडे यांच्यासह महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

# कुलभूषण कंदले याचा सन्मान

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचा विद्यार्थी कुलभूषण कंदले हा सूक्ष्मजीवशास्त्र या विषयामध्ये महाविद्यालयात बी.एस्सी. भाग एक, दोन व तीनमध्ये प्रथम आल्याबद्दल त्याचा शाळेच्या संचालिका वर्षा झाडबुके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने झाडबुके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. अरुषा नंदीमठ यांनी कौतुक केले. विभागाच्या प्रा. डॉ. नमिता डोईफोडे यांनी देखील अभिनंदन केले.

Scanned with CamScanner

# शिक्षण उपसंचालकांची झाडबुके महाविद्यालयास भेट

**बार्शी :** बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयास पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक औदुंबर उकीरडे व बार्शी नगर पालिकेच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांनी भेट दिली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी औदुंबर उकीरडे यांचा सत्कार केला तर उपप्राचार्य सुर्वे यांनी बनसोडे यांचा सत्कार केला. प्रास्ताविक पर्यवेक्षक सुनील खराडे यांनी केले. उकीरडे म्हणाले, आपण महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहोत याचा आवर्जुन अभिमानाने उल्लेख केला आणि महाविद्यालयीन जीवनातील स्मृतींना उजाळा दिला आणि महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बार्शी टेक्निकल हायस्कुलचे मुख्याध्यापक टकले उपस्थित होते. महाविद्यालयातील कला आणि विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा. साजीद शेख यांनी तर आभार सुर्वे यांनी मानले.

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात ई-पीक पाहणी मार्गदर्शन शिबिर


**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी, वनस्पतीशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ई-पीक पाहणी मार्गदर्शन शिबिर झाले. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सुनील शेरखाने, नायब तहसीलदार संजय मुंढे यांचे मार्गदर्शन लाभले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी भुषविले. संजय मुंढे यांनी आपल्या मार्गदर्शनात मिश्र पीक, एकल पिकाची निवड, अक्षांश व रेखांशाची माहिती, पवर माहिती कशी भरावी याचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी अॅपमुळे शेतकऱ्यांना होणारा फायदा, रियल टाईम डाटाचे महत्त्व स्पष्ट केले, तसेच क्रांतीच्या प्रवासात सहभागी होण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे नियोजन आयक्यूएसी कॉर्डिनेटर डॉ गिरीश काशीद यांनी तर कार्यक्रमाचे व्यवस्थापन डॉ. जयराम काशीद यांनी केले. या कार्यसूत्रसंचालन डॉ पी. एस. गांधी, प्रास्ताविक डॉ. कविता गायसमुद्रे, आभार अतुल ढवळे यांनी केले. कार्यक्रमात प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with CamScanner



बार्शी : नागरिकांना लस देताना वैद्यकीय अधिकारी.

# झाडबुके महाविद्यालयात लसीकरण शिबिर उत्साहात

**बार्शी :** 'मिशन युवा स्वास्थ्य' अंतर्गत बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने नगरभूषण भाऊसाहेब झाडबुके यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. 'मिशन युवा स्वास्थ्य' अंतर्गत महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि ज्यांनी पहिला किंवा दुसरा डोस घेतलेला नाही, अशा सर्वांना लस उपलब्ध करून दिली. अधिकाधिक लोकांनी लस घ्यावी म्हणून केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा आरोग्य विभाग प्रयत्नशील असून कोरोना विषाणूवर मात करून लवकरात लवकर जनजीवन सुरळीत व्हावे, शाळा-महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना ऑफलाईन अध्ययन या उद्देशाने सरकार प्रयत्नशील आहे. त्याचाच भाग म्हणून महाविद्यालयात लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये ४७ जणांनी लस घेतली. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, डॉ. गिरीश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पी.एस. गांधी, प्रा.के.टी. व्हनहुवे, डॉ.एस. आर. मुळे व आरुषा नंदीमठ, साजिद शेख, प्रा. सुनील नष्टे प्रा. विजयसिंह पाटील, प्रा. अशोक सुर्वे, प्रा. सुनील खराडे, सुरेश दराडे, ज्योत्स्ना वाघमारे, मनीषा गीते, सुप्रिया उंबरे, दीपाली बेनाळे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com
सोलापूर, शुक्रवार, दि. ५ नोव्हेंबर २०२१

# एनसीसी विद्यार्थ्यांनी बनविलेले कार्ड, पणत्या जवानांना भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

बार्शी : झाडबुके महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सनी स्वतःच्या हस्तकौशल्याने तयार केलेले ग्रीटिंग कार्ड्स आणि पणत्या भारतीय जवानांना पाठविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्याकडे कार्ड आणि पणत्या सुपूर्द केल्या.




यामध्ये एकूण ४० बॉईज कॅडेटस् आणि २४ गर्ल्स कॅडेटनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी आय. क्यू. ए. सी.चे समन्वयक डॉ. गिरीश काशीद, पर्यवेक्षक एस. आर. खराडे, मेजर ए. पी. नंदीमठ, लेफ्टनंट साजिद शेख, नितीन धस, प्रथमेश दळवी, सोनल वावरे, तिशा पवार उपस्थित होते.

या भेटवस्तू नाईन महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रशांत नायर यांच्याद्वारे ग्रुप कमांडर, पुणे ग्रुप, पुणे यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सुपूर्द करण्यात आल्या.

Scanned with CamScanner

जनमत
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव



# विद्यार्थ्यांनी घेतली प्रतिबंधक लस

कारी, दि २८ (प्रतिनिधी) : बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात कोरोना प्रतिबंधक लसीकरणा स विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने नगरभूषण श्रीमान भाऊसाहेब झाडबुके यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून कोविड १९ प्रतिबंधक लसीकरण शिबिर (दि२७ बुधवार) आयोजित करण्यात आले होते.

मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक, शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी, ज्यांनी पहिला किंवा दुसरा डोस घेतलेला नाही अशा सर्वांना कोविशिल्ड लस राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान टीम ने महाविद्यालयात उपलब्ध करून दिली. महाविद्यालयात लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४७ जणांनी लस टोचून घेतली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर आणि आयक्यूएसी चे समन्वयक डॉ. गिरीश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पी.एस.गांधी, प्रा.के.टी.व्हनहुवे,डॉ.एस. आर. मुळे व राष्ट्र छात्र सेनेच्या मेजर आरूषा नंदीमठ आणि लेफ्टनंट साजिद शेख , बीबीए व बीसीए चे विभागप्रमुख प्रा. सुनील नष्टे प्रा. विजयसिंह पाटील,प्रा.अशोक सुर्वे, प्रा. सुनील खराडे श्री सुरेश दराडे तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाच्या सौ. जोत्सना वाघमारे, सौ. मनीषा गीते ,सौ सुप्रिया उंबरे,सौ.दिपाली बेनाळे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

# जनमत

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव


## भारतीय जवानांना दिवाळीनिमित्त ग्रीटिंग कार्ड, पणत्या भेट

## झाडबुके महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम




आसिफ मुलाणी

बार्शी, दि २ (प्रतिनिधी)- बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील एनसीसी थंडीत विद्यार्थ्यांनी सैनिकांच्या कार्यपद्धती असलेली निष्ठा आणि जाणीव याचे प्रकटीकरण म्हणून दिवाळी शुभेच्छांसाठी स्वतःच्या हस्त कौशल्याने ग्रीटिंग कार्ड आणि पणती तयार करून म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मनोज गादेकर यांच्याकडे सुपूर्द केले.

प्राचार्य डॉ गादेकर यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ग्रीटिंग कार्ड पाहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. देशाच्या जवानांबद्दल बोलताना ते म्हणाले की देश संरक्षणार्थ सैनिक बनवून देश सेवा करणारा भारतीय सैनिकातील जवान एक आदर्शवत व्यक्तिमत्व आहे.

मुलांनी तयार केलेले ग्रीटिंग कार्ड व पणती नाईन महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर प्रशांत नायर यांच्याद्वारे ग्रुप कमांडर पुणे ग्रुप यांच्याकडे पुढील कारवाईसाठी सुपूर्द केले आहेत . यामध्ये ४० बॉईज कॅडेत्त व २४ गर्ल कॅडेटनी सहभाग नोंदवला. सर्व विद्यार्थ्यांचे प्राध्यापक ,शिक्षक ,सहशिक्षक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

यावेळी प्राचार्य डॉ मनोज गादेकर, आयक्यू एसी समन्वयक डॉ गिरीश काशीद, मेजर ए. पी नंदीमठ, लेफ्टनंट साजिद शेख, नितीन घस, प्रथमेश दळवी, सोनल वावरे, प्रतिक्षा पवार आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

पुढारी

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे,बार्शी




बार्शी : दिवाळीनिमित्त भारतीय जवानांसाठी तयार करण्यात आलेल्या ग्रीटिंग कार्डसोबत विद्यार्थी.

# विद्यार्थ्यांकडून भारतीय जवानांना ग्रीटिंग कार्ड भेट

बार्शी : बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय जवानांना दिवाळीनिमित्त स्वनिर्मित ग्रीटिंग कार्ड आणि पणत्या भेट दिल्या. भारतीय सैन्यांच्या कार्याप्रती असलेली निष्ठा आणि जाणीव याचे प्रकटीकरण म्हणून दिवाळी शुभेच्छांसाठी एनसीसी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्तकौशल्याने तयार केलेले ग्रीटिंग कार्ड आणि पणत्या प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्याकडे विद्यार्थ्यांनी सुपूर्द केल्या. ग्रीटिंग कार्ड पाहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. देश संरक्षणार्थ सैनिक बनून देशसेवा करणारे भारतीय सैनिकातील जवान एक आदर्शवत व्यक्तिमत्त्व असल्याचे मत व्यक्त केले. मुलांनी तयार केलेले ग्रीटिंग कार्ड अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी सुपूर्द करण्यात आले. यामध्ये एकूण ४० बॉईज कॅडेटस् आणि २४ गर्लस् कॅडेट यांनी सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. गिरीश काशीद, एस.आर. खराडे तसेच मार्गदर्शक मेजर ए.पी. नंदीमठ, साजिद शेख व विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर
दिव्य मराठी, बुधवार, १७ नोव्हेंबर २०२१
५

Barshi Shikshan Prasarak Mandal's

# SHRIMAN BHAUSAHEB ZADBUKE MAHAVIDYALAYA

BARSHI Dist. Solapur - 413 401
Phone No. 02184-222566

The candidates are invited for Walk in interview for the following posts of Asst. Professor on CLOCK HOUR BASIS for Grantable Senior College wing.

## WALK IN INTERVIEW

| Sr. No. | Subject | Total Vacant Posts | Categories for Posts | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Statistics | 02 | 02 Open | B+ in Master's Degree in concerned subject and NET/SET/ Ph.D. Pass as per PAH Solapur University/ State Govt. / U.G.C. Rules. |
| 2 | Chemistry | 04 | 02 Open, 02 OBC | |
| 3 | Microbiology | 04 | 02 OBC, 02 Open | |
| 4 | Botany | 02 | 02 OBC | |
| 5 | Geography | 02 | 02 OBC | |
| 6 | Sociology | 01 | 01 Open | |
| 7 | Economics | 02 | 02 Open | |
| 8 | Philosophy/ Psychology | 01 | 01 Open | |
| 9 | History | 02 | 02 Open | |

**Note :** 1) The interested candidates may appear for interview **on 25/11/2021 at 10.00 am** in the office of Barshi Shikshan Prasarak Mandal's. Shriman Bhausaheb Zadbuke Mahavidyalaya, Barshi along with the original Testimonials & Attested Photo-Copies.

2) There would be No TA/DA for attending interviews.

3) Education Qualification, Experience etc. applicable for the post are as per norms specified by UGC., Govt. of Maharashtra & Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur issued from time to time.

4) Appointments are purely on temporary basis and for the academic year 2021-22 only.

**(Dr. M.B. Gadekar)**
I/c Principal
Shriman Bhausaheb Zadbuke,
Mahavidyalaya Barshi

**(Smt. Prabhavati S. Zadbuke)**
Chairman
Barshi Shikshan Prasarak
Mandal Barshi

Scanned with CamScanner

epaper.lokmat.com
सोलापूर, सोमवार, दि. १३ डिसेंबर २०२१ 

लोकमत इन्फोग्राफिक्स

# झाडबुके कॉलेजचा विद्यार्थी सैन्यदलात

लोकमत न्यूज नेटवर्क

बार्शी : श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय येथील एन.एन.सी. विभागाचा बीएस्सी. भाग एकमध्ये शिकत असलेला विद्यार्थी गणेश मांजरे यांची नुकतीच रत्नागिरी येथे झालेल्या सैन्यदलाच्या भरती प्रक्रियेतून भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे.

त्यांना लेफ्टनंट साजिद शेख व मेजर आरुष नंदीमठ यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, उपप्राचार्य प्रा. अशोक सुर्वे, पर्यवेक्षक प्रा. सुनील खराडे, प्रा. संदीप उबाळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर. रविवार, १९ डिसेंबर २०२१ | ४

# अल्पसंख्याकची संकल्पना दर्जावाचक : सूर्यकांत घुगरे

प्रतिनिधी | बार्शी

सामान्यतः अल्पसंख्याक या शब्दाच्या अर्थाबाबत समाजामध्ये काहीसा अपरिचितपणा जाणवतो. अल्पसंख्याक म्हणजे असा समुदाय की, ज्यांना स्वतंत्र धार्मिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान लाभलेले असते. अल्पसंख्याकांच्या विकासासाठी प्रत्येक वर्षी शासन हजारो कोटी रुपयांची तरतूद करत असते. धर्म, अल्पसंख्याक आणि जनगणना अल्पसंख्याकांच्या दर्जासाठी महत्त्वपूर्ण बाबी आहेत. अल्पसंख्याकांचा दर्जा मिळणे हा समुदायाच्या विकासाचा जणू राजमार्गच होय. वस्तुतः अल्पसंख्याक ही एक प्रमुख मध्यमवर्गीय व महत्त्वाची संकल्पना आहे, असे मत डॉ. सूर्यकांत घुगरे यांनी व्यक्त केले. अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. बी. आर. काळे हे उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. विशाल लिंगायत यांनी करून दिला तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. संजय नाईनवाड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास डॉ. वैभव वाघमारे, प्रा. जे. के. काशिद, ग्रंथपाल अनिल जेवळीकर, प्रा. एस. एस. मुळे, डॉ. कविता गायसमुद्रे आदी प्राध्यापक उपस्थित होते.

Scanned with CamScanner

जनमत सर्वसामान्यांचे | दिनांक ३० डिसेंबर २०२१ | पान २

# श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा सन्मान

कारी दि.१९ (प्रतिनिधी)– श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय व माजी विद्यार्थी समिती आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रम तसेच प्राध्यापक प्रबोधनी आयोजित व्याख्यानाचे आयोजन (बुधवार दि२८) रोजी महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. दीपक शिंदे (वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ – लंडन ) तसेच श्‍ संतोष मस्तूद (पोलीस निरीक्षक – मुंबई) या दोन माजी विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. पाटील यांनी केले.तर पाहुण्यांचा परिचय रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एम. डी. कांबळे यांनी करून दिला.

डॉ. दीपक शिंदे म्हणाले परदेशातील संशोधनाच्या संधी या विषयावर शास्त्रज्ञ म्हणून जरी काम करत असलो तरी आपल्या कामात जर परिश्रम, चिकाटी, जिद्द असेल आणि मनसोक्त आनंद मिळविण्यासाठी आपण जर काम करत असू, तर नक्कीच यश मिळते. तसेच या महाविद्यालयात विद्यार्थी असतानांच्या काही आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. तसेच पीएचडी झाल्यानंतर लंडनमधील वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ म्हणून काम करत असतांना आलेल्या अनुभवांचाही त्यांनी उल्लेख केला.



संतोष मस्तूद यांनी महाविद्यालयीन जीवनातील विद्यार्थी दशेत एन. सी.सी. व एन.एस.एस.च्या माध्यमातून आम्ही कसे घडत गेलो याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षेतील यशात या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केलेल्या सहकार्याचा व मदतीचा उल्लेख केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी विचार मांडले. सूत्रसंचालन प्रा. एस. आर. मुळे तर आभार डॉ संजय नाईनवाड यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम सोशल डिस्टंसिंगचे नियम पाळून संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय आणि माजी विद्यार्थी समिती आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रम तसेच प्राध्यापक प्रबोधनी आयोजित व्याख्यान महाविद्यालयात झाले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ डॉ. दीपक शिंदे, पोलिस निरीक्षक संतोष मस्तूद या दोन माजी विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्या हस्ते या दोन प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एम. डी. कांबळे यांनी करून दिला.



**बार्शी : माजी विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी उपस्थित मान्यवर.**

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. दीपक शिंदे यांनी आपल्या मनोगतात परदेशातील संशोधनाच्या संधी या विषयावर शास्त्रज्ञ म्हणून जरी काम करत असलो तरी आपल्या कामात जर परिश्रम, चिकाटी, जिद्द असेल आणि मनसोक्त आनंद मिळविण्यासाठी आपण जर काम करत असू, तर नक्कीच यश मिळते. तसेच या महाविद्यालयात विद्यार्थी असतानाच्या काही आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. तसेच पीएचडी झाल्यानंतर लंडनमधील वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ म्हणून काम करत असतांना आलेल्या काही अनुभवांचाही त्यांनी उल्लेख केला. कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख पाहुणे संतोष मस्तूद यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयीन जीवनातील विद्यार्थी दशेत असताना एनसीसी व एनएसएसच्या माध्यमातून आम्ही कसे घडत गेलो, याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षेतील यशात या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केलेल्या सहकार्याचा व मदतीचा आवर्जून उल्लेख केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे आभार डॉ. संजय नाईनवाडी यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. आर. मुळे यांनी केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून झाला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

Scanned with CamScanner

जनमत सर्वसामान्यांचे | दिनांक ०६ जानेवारी २०२२ | पान २

# श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



कारी दि.०५ (प्रतिनिधी)– श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्यावतीने भारताची पहिली महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांची १९१ वी जयंती साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यातून मिळालेला वारसा आपण सक्षम पणे पुढे चालला पाहिजे असे मत डॉ. नवनाथ दनाने यांनी मांडले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एम .डी .कांबळे , उपप्राचार्य सुर्वे ,आयक्यू एससी कॉर्डिनेटर डॉ काशीद, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. नैनवाड , डॉ. रमेश आजरी, डॉ जे.पी .झाडबुके ,खराडे , यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापककेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिम ेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी डॉ रुपाली मोरे यांनी सावित्रीबाईचे कार्य व सध्याची स्थिती यावर आपले मत व्यक्त केले .वैशाली वाघमारे (निंबाळकर)व बागडे यांनी क्रांतीज्योती व क्रांतीसुर्य यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे समारोप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य कांबळे एम.डी यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ कविता गायसमुद्रे तर आभार डॉ नैनवाड केले.


Scanned with CamScanner

जनमत सर्वसामान्यांचे | दिनांक ०८ जानेवारी २०२२ | पान २

# झाडबुके महाविद्यालयात सिंधुताई सपकाळ यांना अभिवादन

कारी दि.०७ (प्रतिनिधी)- अनाथांची माय, पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांना (शुक्रवार दि०७) श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने श्रद्धांजली सभा आयोजित करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

सिंधूताई सपकाळ यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. सिंधुताई सपकाळ यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४७ रोजी महाराष्ट्रातील वर्धा येथे झाला होता. माई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधूताईचं जीवन अत्यंत खडतर होतं. बालविवाह झालेल्या सपकाळ यांनी नवऱ्याने केलेल्या अत्याचारांनंतर घर सोडलं. त्यानंतर अनाथांचा सांभाळ करणं हे त्यांनी आयुष्याचं ध्येय बनवले होते.



यावेळी आय.क्यू.एसीचे समन्वयक डॉ.गिरीश काशीद यांनी सिंधुताईंच्या समाज कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या आठवणींना उजाळा देताना म्हणाले की ज्येष्ठ समाजसेविका व 'अनाथांची माय' अशी ओळख असलेल्या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित सिंधूताई यांनी अनेक खडतर प्रसंगाना तोंड देत हजारो अनाथ मुलांचा सांभाळ केला.

Scanned with CamScanner

# भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात कोरोना प्रतिबंधक लसीकरण शिबिर

**बार्शी :** श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालय विभाग व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. ओमायक्रोन या कोरोना विषाणूच्या नव्या व्हेरिएंटला थोपविण्याच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालंयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर व उपप्राचार्य अशोक सुर्वे आणि पर्यवेक्षक प्रा. सुनील खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात १९४ विद्यार्थिनींना तर ३५१ विद्यार्थ्यांना कोवॅक्सिनची मात्रा देण्यात आली. शिबिरासाठी साजिद शेख, प्रा. संदीप उबाळे, प्रा. गणेश नाकाडे, प्रा. योगिराज घेवारे, प्रा. मनोज गोंदकर, प्रा. भास्कर करडे, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाचे नोडल ऑफिसर सुधीर घोडके, विकी मुसंडे आणि आरोग्य सेविका एम.बी. गीते, एम.बी. नलवडे, एस. बी. सुरवसे व आशा वर्कर्स सुप्रिया उंबरे, दीपाली बेताळे, मीनाक्षी व्हटकर, अनुराधा बागडे यांच्यासह अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर. शुक्रवार, २१ जानेवारी २०२२ | पौष कृ.३, शके १९४३

LIBRARY

# झाडबुके महाविद्यालयात भूगोल दिन उत्साहात

प्रतिनिधी | बार्शी

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय येथे भूगोल विभागाच्या वतीने भूगोल दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे माजी भूगोल विभाग प्रमुख प्रा. सौदागर केमदारणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थान प्रा.भास्कर करडे यांनी भूषविले. भूगोलाचे महत्त्व लक्षात घेता ऑनलाइन पद्धतीने पृथ्वीगोलाचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमांतर्गत प्रश्नमंजूषा, पोस्टर सादरीकरण, मनोगत इ. विविध उपक्रमांचे आयोजन ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. महाविद्यालयातील विविध शाखांमधून विद्यार्थ्यांनी भरघोस सहभाग नोंदविला. या उपक्रमातील पाच विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आपले मनोगत व्यक्त केले. भूगोल दिन व मकरसंक्रांत, सूर्याचे भासमान भ्रमण, उत्तरायण, दक्षिणायन व ऋतू निर्मिती यांचा असणारा परस्परसंबंध कशा प्रकारे आहे याविषयीचे पृथ्वीगोलाच्या साह्याने सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. सौदागर केमदारणे यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. भास्कर करडे यांनी १४ जानेवारी लाच मकरसंक्रांत का येते ? १४ जानेवारीपासून दिनमानातील बदल, तसेच भूगोल दिनाचे महत्त्व व भूगोल व भारतीय परंपरा यांचा सहसंबंध कशा रीतीने आहे याची उकल देखील केली.प्रा. वैशाली निंबाळकर यांनी प्रश्नमंजूषा व पोस्टर सादरीकरण उपक्रमातील निकाल घोषित केला. उपक्रमातील सहभागी विद्यार्थी व प्रथम क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या ऑनलाइन कार्यक्रमात प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काशीद, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. वैशाली निंबाळकर यांनी केले. प्रा. हमीद काझी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कु. हर्षदा गात या विद्यार्थिनीने सूत्रसंचालन केले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर. बुधवार, ९ फेब्रुवारी २०२२ | पौष शु. ८, शके १९४३

# बार्शीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

बार्शी | येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या मराठी विभाग व राज्य सरकारच्या मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये विविध उपक्रम ऑनलाईन राबवण्यात आले.

यात विद्यार्थी काव्यवाचन स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, मराठी बोली भाषेतील, मराठी भाषेतील चारोळी संकलन, विविध वाहनांवरील बोधवाक्य संकलन, लेखक आपल्या भेटीला उपक्रमांतर्गत आंदकोळ या आत्मकथनाचे लेखक किसन चव्हाण यांचे मी आणि माझे आत्मकथन या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते.

भाषा अनुवाद कौशल्य व नोकरी रोजगाराच्या संधी या विषयावर प्रसिध्द अनुवादक डॉ. गिरीश काशीद यांचे विशेष व्याख्यान झाले. या उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नवनाथ दणाणे, डॉ. विशाल लिंगायत, प्रा. संदीप उबाळे प्रा. योगीराज घेवारे, प्रा. राहूल माने, डॉ. संजय नाईनवाड यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

दिनांक
07/02/2022

जनमत
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव

आसिफ मुलाणी

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात विविध उपक्रमाने साजरा

कारी, दि.०६ (प्रतिनिधी)- श्रीमान भाऊसाहेब झाडबुके म हाविद्यालयात, मराठी विभाग व महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्ताने १४ जानेवारी ते २८जानेवारी २०२२ या कालावधीमध्ये विविध उपक्रम ऑनलाईन माध्यामातुन राबविण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थी काव्यवाचन स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, मराठी बोली भाषेतील, मराठी भाषेतील चारोळी संकलन, विविध बोधवाक्य संकलंन, तसेच लेखक आपल्या भेटीला उपक्रमा अंतर्गत 'आंदकोळ' या आत्म कथनाचे लेखक किसन चव्हाण यांचे 'मी आणि माझे आत्मकथन या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. भाषा अनुवाद कौशल्य व नोकरी रोजगाराच्या संधी या विषयावर प्रसिध्द अनुवादक डॉ. गिरीश काशीद यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. अशा विविध उपक्रमांच्या माध्यामातुन 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात आला. उपक्रम ांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांचे मार्गदर्शन लाभाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नवनाथ दणाणे, डॉ. विशाल लिंगायत, प्रा. संदीप उबाळे प्रा. योगीराज घेवारे, प्रा. राहूल माने, डॉ. संजय नाईनवाड यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

तरुण भारत संवाद
स्पंदन
। सोलापूर । गुरुवार, १० फेब्रुवारी २०२२ । पान : ५ ।

# बहुभाषिकता ही भारतीय संस्कृतीचे प्राबल्य स्थान

## डॉ. गिरीश काशीद यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
सोलापूर

भारत हा बहुभाषिक देश आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा प्राप्त झाला. आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी केली आहे. त्यात राष्ट्रभाषा हिंदी बरोबरच प्रादेशिक भाषेला आणि इंग्रजी भाषेला स्थान प्राप्त झाले आहे, असे मत डॉ. गिरीश काशीद यांनी व्यक्त केले.

ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ भाषा व वाङ्मय संकुल, हिंदी विभाग आणि एनटीपीसी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अनुवाद आणि रोजगार या विषयावर ते बोलत होते. विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस अध्यक्षस्थानी होत्या.

आजच्या शैक्षणिक धोरणांमध्ये देखील अशीच तरतूद केली आहे. त्यामुळे हिंदी भाषेला भारतीय भाषांमध्ये एक मोलाचे स्थान प्राप्त आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात धोरण २०२० नुसार हिंदी भाषेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. आज हिंदीचा प्रचार आणि प्रसार वाढतच चाललेला आहे. तरुणांची अभिव्यक्तीची भाषा बदलत आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्वटिर, ब्लॉग यासारख्या समाजमाध्यमांवर आज हिंदी भाषेतून संवाद साधला जात आहे. ज्या व्यक्तींना अधिक भाषा येतात त्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. अनुवादामुळे आपण जगाशी जोडले जातो. अनुवादक हा आपल्या अनुवादातून सांस्कृतिक सेतू बांधत असतो. आज प्रकाशन व्यवसायात उत्तम अनुवादक मिळत नाहीत. आजचं युग हे जाहिरातीचे आहे. त्यातून रोजगाराच्या असंख्य संधी आज उपलब्ध आहेत. हिंदी बरोबरच इतर भाषा शिकणाऱ्या विद्यार्थी आणि व्यक्तींना आज या क्षेत्रांमध्ये असंख्य रोजगार निर्माण झाले आहेत. तसेच, महाराष्ट्रामध्ये कार्यरत असणाऱ्या हिंदी विषयक संस्थांमध्ये नोकरीच्या विविध संधी उपलब्ध आहेत. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी एनटीपीसी सोलापूर यांनी विद्यापीठातील हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे त्याबद्दल आभार मानले. हिंदी भाषेच्या प्रचार आणि प्रसार यामध्ये चित्रपट हे एक चांगले माध्यम आहे. आज व्यापार, शिक्षण आणि वाणिज्य क्षेत्रामध्ये हिंदी भाषा अग्रगण्य आहे. आपण जेव्हा इतर भाषा आणि त्यातले बारकावे शिकतो तेव्हा आपोआपच आपल्या व्यक्तिमत्वामध्ये बदल होत असतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी हिंदीबरोबरच इतर प्रादेशिक भाषा शिकल्या पाहिजेत. त्यातून अनुवाद आणि संशोधनाकडे वळले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

संकुलाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अनंत वडघणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून आभार मानले. ममता बोल्ली यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास विविध महाविद्यालय आणि विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दि.10/02/2022

जनमत
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव

आसिफ मुलाणी



# सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत शिवकुमार माळीने मिळवले यश

कारी, दि.०९ (प्रतिनिधी)– श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवकुमार विजय माळी याने २७व्या जूनियर स्टेट सॉफ्टबॉल चॅम्पियनशीप स्पर्धेत घवघवीत यश मिळवले. ज्युनियर स्टेट सॉफ्टबॉल चॅम्पियमशीप स्पर्धा औरंगाबादमध्ये पार पडल्या. यावेळी सोलापूर संघ विजयी झाला असून या संघाच नेतृत्व शिवकुमार विजय माळी याने केले. विशाखापट्टणम येथे होणाऱ्या ३९ व्या ज्युनियर नॅशनल चॅम्पियन स्पर्धेसाठी निवड झाली होती. तसेच नॅशनल स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला तृतीय क्रमांक मिळाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले व पुढील खेळासाठी शुभेच्छा दिल्या . यावेळी प्रा.रमेश आजरी, प्रा. मोहन कांबळे, डॉ. गिरीश काशीद, प्रा.गणेश नाकाडे,डॉ. जयराम काशीद ,प्रा. सागर खराडे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner



बार्शी : राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल शिवकुमार माळी याचा सत्कार करताना प्रा. डॉ. मनोज गादेकर, रमेश आजरी आदी.

# झाडबुके महाविद्यालयाच्या शिवकुमार माळीचे सॉफ्टबॉल स्पर्धेत यश

**बार्शी :** श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवकुमार विजय माळी याने २७ व्या ज्युनिअर स्टेट सॉफ्टबॉल चॅम्पियनशीप स्पर्धेत यश मिळवले आहे. २७ व्या ज्युनिअर स्टेट सॉफ्टबॉल चॅम्पियमशीप स्पर्धा औरंगाबादमध्ये पार पडल्या होत्या. यामध्ये सोलापूर संघ विजयी झाला असून या संघाचे नेतृत्व महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवकुमार माळी याने केले. शिवकुमार माळी याची विशाखापट्टणम येथे होणाऱ्या ३९ व्या ज्युनिअर नॅशनल चॅम्पियन स्पर्धेसाठी निवड झाली होती तसेच नॅशनल स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला तृतीय क्रमांक मिळाला. यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन शिवकुमार माळीचे स्वागत केले. याप्रसंगी प्रा. रमेश आजरी, प्रा. मोहन कांबळे, डॉ. गिरीश काशीद, प्रा. गणेश नाकाडे, डॉ. जयराम काशीद, प्रा. सागर खराडे उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले.

Scanned with CamScanner

संक्षिप्त




बार्शी : प्रजासत्ताक दिन परेडमध्ये यश मिळवून दिल्याबद्दल आरुषा शेटे-नंदीमठ यांचा सत्कार करताना प्रा. मनोज गादेकर, आर. जे. बिडकर आदी.

## भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात मेजर आरुषा शेटे-नंदीमठ यांचा सत्कार

बार्शी : दिल्ली येथे २६ जानेवारी २०२२ रोजी झालेल्या प्रजासत्ताकदिनानिमित्त परेड स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून महाराष्ट्राच्या एनसीसीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत मुख्य भूमिका पार पाडलेल्या बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या ए.एन.ओ. आरुषा शेटे-नंदीमठ यांचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य मनोज गादेकर होते. आर.जे. बिडकर, एस.आर. खराडे उपस्थित होते. शेटे-नंदीमठ यांनी आपला खडतर प्रवास कशा पद्धतीने पूर्ण केला याबद्दल मनोगतात सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य मनोज गादेकर यांनीही शेटे यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन अनिल गेळे यांनी केले. कार्यक्रमासाठी शेख साजिदसह एनसीसी बॉईज आणि गर्ल्स कॅडेटनीं महत्त्वाची भूमिका पार पाडली. कार्यक्रमाला महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर. शनिवार, १२ फेब्रुवारी २०२२ | ४

# झाडबुके महाविद्यालयात आरुषा शेटे यांचा सत्कार




बार्शीतील झाडबुके महाविद्यालयात आरुषा शेटे-नंदीमठ यांचा सत्कार झाला.

**प्रतिनिधी | बार्शी**

२६ जानेवारी रोजी दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन परेड स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून महाराष्ट्राच्या एनसीसीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून देण्यामध्ये महत्त्वाचे भूमिका पार पाडलेल्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या एएनओ अरुषा शेटे-नंदीमठ यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षपदी प्राचार्य एम. बी गादेकर होते.

यावेळी मेजर अरुषा शेटे-नंदीमठ यांनी आपला येथपर्यंतचा प्रवास सांगितला. यात संस्थेच्या अध्यक्षा प्रभावती झाडबुके आणि खजिनदार वर्षा ठोंबरे- झाडबुके यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभल्याचे सांगितले. महाराष्ट्राला प्रथम क्रमांक मिळवून देण्यामधे ९ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रशांत नायर, ग्रुप कमांडर ब्रिगेडियर आर. के. गायकवाड यांचा सिंहाचा वाटा असल्याचे म्हटले. तसेच आर.जे. बिंडकर यांनी कॉलेजच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा मेजर अरुषा शेटे-नंदीमठ यांच्यामुळे रोवला गेला आहे असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य मनोज गादेकर यांनी अभिनंदनपर मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी विभागप्रमुख आर.जे. बिडकर तसेच पर्यवेक्षक एस.आर. खराडे उपस्थित होते.

सूत्रसंचालन अनिल गेळे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये लेफ्टनंट शेख साजिद आणि सर्व एनसीसी बॉईज आणि गर्ल्स कॅडेटनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

Scanned with CamScanner

संचार | सोलापूर, शनिवार, १२ फेब्रुवारी २०२२ | ५ | संमिश्र

# महाराष्ट्राच्या एनसीसीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक

## बार्शीच्या मेजर नंदीमठ यांचा दिल्लीत तीन महिने मुक्काम



बार्शी : मेजर अरुषा शेटे-नंदीमठ यांचा सत्कार करण्यात आला.

संचार प्रतिनिधी

बार्शी, दि. ११- प्रजासत्ताक दिन परेड स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून महाराष्ट्राच्या एनसीसीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून यामध्ये मेजर अरुषा शेटे-नंदीमठ यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके विद्यालयात मेजर शेटे - नंदीमठ या प्राध्यापिका आहेत. प्रजासत्ताक दिनाच्याआधी तीन महिने झाडबुके महाविद्यालयाच्या एएनओ शेटे-नंदीमठ या आपल्या एनसीसी तुकडीसह दिल्लीत मुक्कामाला होत्या. कडाक्याच्या थंडीत प्रशिक्षण व सराव त्या करीत होत्या. सोलापूर जिल्ह्यासह राज्यात एक महिला म्हणून पार पाडलेली जबाबदारी मुलींनाही प्रेरणा देणारी आहे. प्राचार्य एम. बी. गादेकर यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केले. यामुळे मेजर नंदीमठ यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य एम. बी. गादेकर होते. 'व्यासपीठावर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख आर. जे. बिडकर, पर्यवेक्षक' एस. आर. खराडे उपस्थित होते.

यावेळी बोलताना मेजर शेटे-नंदीमठ म्हणाल्या, जीवनात ध्येयासक्ती महत्त्वाची असून यासाठी वेळेचे नियोजन, जिद्द, शिस्त अन् प्रबळ इच्छाशक्ती गरजेची असते. आपला खडतर प्रवास यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा प्रभावती झाडबुके तसेच संस्थेच्या आधारस्तंभ वर्षा ठोंबरे- झाडबुके यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले, असेही त्या म्हणाल्या.

महाराष्ट्राला प्रथम क्रमांक मिळवून देण्यात ९ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रशांत नायर, ग्रुप कमांडर ब्रिगेडियर आर. के. गायकवाड यांचा सिंहाचा वाटा होता.

तसेच आर.जे. बिडकर यांनी आपल्या भाषणात मेजर शेटे-नंदीमठ यांचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य गादेकर यांनी महाविद्यालयाचे नावलौकिक वाढविणारे विद्यार्थी, प्राध्यापक नक्कीच प्रेरणा देणारे असतात, असे सांगून मेजर नंदीमठ यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गेळे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये लेफ्टनंट साजिद शेख आणि सर्व एनसीसी मुले, मुली यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. कार्यक्रमाला प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**बार्शी :** बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागच्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस साधनव्यक्ती म्हणून प्रा. डॉ. राहुल देशमुख, ग्रंथपाल आर. जी. शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. जगदीश झाडबुके उपस्थित होते. ग्रंथपाल प्रा.अनिल जेवळीकर यांनी आपल्या प्रास्ताविकात यांनी एन लीस्ट एनडीएल संकल्पनासाठी कशा उपयोगी आहेत, पारंपरिक ग्रंथालय कुठेतरी कमी पडत आहेत अशावेळी त्यांना पूरक अशी माध्यमे वाचकांपर्यंत माहिती पोहोचवण्याची ही माध्यमे आहेत. याबद्दल माहिती सांगितली.साधन व्यक्ती डॉ.प्रा. राहुल देशमुख यांनी एन लीस्ट एनडीएल ही माध्यमे कशी वापरावीत, तसेच या माध्यमाचा उपयोग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कसा होईल, संशोधकांना कसा होईल याबद्दल माहिती सांगितली. ही माध्यमे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यात कशी मदत करतात याबद्दल सविस्तर विवेचन डॉ. प्रा. राहुल देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर आपल्या शैक्षणिक कार्यात केला पाहिजे, असे मत डॉ. जगदीश झाडबुके यांनी केला. कार्यशाळेस संस्थेच्या खजिनदार वर्षा ठोंबरे, प्राचार्य डॉ. मनोज गादेकर,. उपप्राचार्य अशोक सुर्वे, पर्यवेक्षक प्रा. सुनील खराडे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यशाळेसाठी ग्रंथालय विभागातील कर्मचारी विक्रम सुरवसे, सुरेश दराडे, जितेन्द्र गाडे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

जनमत सर्वसामान्यांचे
दिनांक २३ फेब्रुवारी २०२२
पान २

# झाडबुके महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

कारी दि.२२ (प्रतिनिधी)– श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक संदीप उबाळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख डॉ. गिरीश काशीद होते.चंद्रकांत गायकवाड व मराठी विभाग प्रमुख डॉ. नवनाथ दणाणे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. चंद्रकांत गायकवाड यांनी आपल्या मनोगतात शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन रांझे गावचा पाटील व बेलवाडीच्या किल्लेदारीन सावित्रीबाई देसाई हे प्रसंग शाहिरी शैलीत कथन करून अधोरेखित केला.

डॉ. नवनाथ दणाणे यांनी शिवाजी महाराजांच्या विविध गुणांचा परामर्श घेत–घेत महाराज एक राजा, एक पुत्र,एक पिता म्हणून कसे महान होते हे सांगितले. शिवाजी महाराज कोणत्याही एका जातीचे,धर्माचे राजे नव्हते तर ते संपूर्ण रयतेचे राजे होते हे स्पष्ट करून हिंदवी स्वराज्य ही संज्ञा उलगडून दाखविली. अध्यक्षीय भाषणात डॉ. गिरीश काशीद यांनी कलायोगी जी.कांबळे यांनी शिवाजी महाराजांच्या काढलेल्या अस्सल चित्राचे सविस्तर विश्लेषण करून त्या चित्राचे महत्त्व विशद केले. राजगड चे वेगळेपण व त्याची वैशिष्ट्ये सांगितली. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे वर्णन केले. यावेळी महाविद्यालयाचे



उपप्राचार्य,पर्यवेक्षक, प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल माने तर आभार योगिराज घेवारे यांनी मानले.

Scanned with CamScanner

जनसत्य बुधवार, दि. २३ फेब्रुवारी २०२२

# आरशात पाहून हसण्यासारखा अर्थसंकल्प

## भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात अर्थसंकल्प २०२२-२३ वर व्याख्यान

**जनसत्य प्रतिनिधी**



**बार्शी :** येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विभागाच्या वतीने, अर्थसंकल्प२०२२-२३ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मनोज गोंदकर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. नवनाथ दणाणे यांनी भूषविले. प्रमुख वक्त्यांनी 'आरशात पाहून हसण्यासारखा अर्थसंकल्प आहे' या वाक्यानी आपल्या भाषणाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सय्यद सिकंदर यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये अर्थसंकल्प म्हणजे काय व अर्थसंकल्प कशाप्रकारे तयार केला जातो याबाबतची मुलभुत पार्श्वभूमी सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. ए. प्रथम वर्ष चा विद्यार्थी नितीन देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. मोरे रूपाली यांनी केले. कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. मनोज गादेकर व आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. गिरीश काशीद यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी डॉ.जयसिंग सिंगल यांनी तांत्रिक सहाय्य केले तर फलक लेखन उमेश मदने यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. आशिष रजपूत, प्रा. वैशाली निंबाळकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री जितेंद्र गाडे व श्री विक्रम सुरवसे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी

सोलापूर. सोमवार, २८ फेब्रुवारी २०२२ | माघ कृ. १३, शके १९४३

# झाडबुके महाविद्यालयात आज कार्यशाळा

**बार्शी** | येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या आयक्यूएसी विभाग आणि राजीव गांधी राष्ट्रीय बौद्धिक संपदा व्यवस्थापन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त २८ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत डॉ. भारत एन. सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर असतील. ही कार्यशाळा बहुउद्देशीय सभागृह हॉल क्रमांक ३ मध्ये होणार आहे. या कार्यशाळेसाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाने केले आहे.

Scanned with CamScanner

SPORTS

# झाडबुके महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्यावतीने काव्यवाचन स्पर्धा व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करुन करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. नवनाथ दणाणे यांनी केले. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसाराच्या कार्यामध्ये सर्व मराठी भाषिकांनी आपले योगदान दिले पाहिजे, अशी अपेक्षा डॉ. दणाणे यांनी व्यक्त केली. त्यानंतर काव्यवाचन स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी ऑफलाईन व ऑनलाईन स्पर्धेत मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

बार्शी येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, प्रा. डॉ. सूर्यकांत घुगरे, प्रा. जयराम मुसळे, डॉ. नवनाथ दणाणे, डॉ. गिरीश काशीद, प्रा. अनिल जेवळीकर, डॉ. विशाल लिंगायत यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये मिनल काळे, हर्षदा देशमुख, लक्ष्मी झोंबाडे यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोज गादेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग व महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाच्या वाटचालीचे कौतुक केले.

Scanned with CamScanner

## संक्षिप्त




**बार्शी : झाडबुके महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेप्रसंगी मान्यवरांचा सत्कार करताना प्रशालेतील शिक्षक.**

# झाडबुके महाविद्यालयात कार्यशाळा

**बार्शी :** बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञानदिनाचे औचित्य साधून एकदिवसीय बौद्धिक हक्क संपदा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेची सुरुवात चंद्रशेखर वेंकटरमण आणि श्रीमान भाऊसाहेब झाडबुके यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, प्रा. एम. डी. कांबळे यांच्या उपस्थितीत ऑनलाईन कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. आर. एम. मोहिते यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ. भारत एन. सूर्यवंशी यांनी बौद्धिक हक्क संपदा व पेटंटसंदर्भात वेगवेगळ्या मुद्द्यांवर विचार व्यक्त केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी महाविद्यालयातील बीएस्सी व बीबीए, बीसीएच्या विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा म्हणजे ज्ञानाची बौद्धिक संपदा पुरवणारी प्रेरणास्रोत ठरेल, असे सांगितले. यावेळी डॉ. गिरीश काशीद, डॉ. व्ही. पी. लिंगायत, डॉ. व्ही. एच. वाघमारे, डॉ. मेजर आरुषा नंदीमठ, प्रा. एम. डी. कांबळे, प्रा. व्ही. ए. पाटील, डॉ. नवनाथ दणाणे, जितेंद्र गाडे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner



बार्शी : पुरी येथे श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी कृष्णात बोधे, डॉ. मनोज गादेकर, अमर पवार आदी.

# पुरी येथे श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन

**बार्शी :** पुरी (ता. बार्शी) येथे श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत १७ ते २३ मार्चपर्यंत विशेष श्रमसंस्कार शिबिर असून, या शिबिराचे उदघाटन पांगरीचे माजी सरपंच कृष्णांत बोधे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर होते. पुरीचे सरपंच अमर पवार, गणेश उपरे, रामेश्वर झालटे उपस्थित होते. यावेळी बोधे यांनी 'श्रमसंस्कार शिबिर हे विद्यार्थी घडविण्याचे केंद्र असतात' असे म्हटले. श्रमसंस्कारांचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे घेऊन जाण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी विद्यार्थ्यांना श्रमसंस्कार शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगल्या वर्तनातून गावासमोर आदर्श निर्माण करावा, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. सूत्रसंचालन प्रा. वैशाली निंबाळकर व डॉ. रुपाली मोरे यांनी केले तर स्वागत गीत मीनल काळे व अशुमती दहिवडकर या विद्यार्थिनींनी गायले. उपसरपंच दिपाली उपरे, ग्रामसेवक एम.आय. मुलाणी, डॉ. पुष्कर गांधी, प्रा. स्नेहलता मुळे, प्रा के. टी.व्हनहुवे, सुरेश दराडे, प्रा.सिकंदर सय्यद, सूर्यकांत दीडवळ उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, मंगळवार, दि. २२ मार्च २०२२


# श्रमसंस्कार शिबिरातून पुरीवासीयांचे प्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

कुसळंब : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मौजे पुरी येथे सुरू असलेल्या सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये रक्तदान शिबिर पार पडले. या शिबिरात गावातील नागरिक, विद्यार्थ्यांनी आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. गुणवंत सरवदे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. शिबिरापूर्वी योगासने, प्रभात फेरी, गावाची स्वच्छता, तर संध्याकाळच्या सत्रात मार्गदर्शनपर व्याख्याने, काव्य संमेलन, कीर्तन असे अनेक उपक्रम होत आहेत. या शिबिराचे उद्घाटन पांगरीचे माजी सरपंच कृष्णात बोधे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी युवा व्याख्याते खंडू डोईफोडे यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक धनमंत झाल्टे उपस्थित होते. शिबिराच्या



पुरी येथे भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत गावातून प्रभातफेरी काढून जनजागृती करण्यात आली.

तिसऱ्या दिवशी कविसंमेलन पार पडले. या काव्यसंमेलनात विनोद गादेकर, श्याम नवले, अरविंद दगरगेकर, दिलीप चौधरी यांनी कविता सादर केल्या. शिबिराच्या चौथ्या दिवशी वक्ते धनराज भारती यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रा. एम. डी. कांबळे होते.

या शिबिरास डॉ. प्रकाश शिंदे, प्रा. राजशेखर आळगीकर, पांगरी पोलीस स्टेशनचे एपीआय तोरडमल. विशाल रोंगे यांनी सदिच्छा भेट दिली. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काशीद, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. पुष्कर गांधी, प्रा. के.टी. व्हनहुवे, डॉ. स्नेहलता मुळे, सुरेश दराडे, डॉ.जयसिंग सिंगल यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, मंगळवार, दि. २२ मार्च २०२२



पुरी येथे श्रमसंस्कार शिबिराअंतर्गत प्रभात फेरी काढताना विद्यार्थी.

# पुरी येथे श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

कुसळंब : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत पुरी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे..या शिबिराचे उद्घाटन पांगरीचे माजी सरपंच कृष्णात रामचंद्र बोधे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर हे होते. यावेळी सरपंच अमर पवार, प्रा. गणेश उपरे, रामेश्वर झालटे, समन्वयक डॉ. गिरीश काशीद, ग्रामसेवक एम. आय. मुलाणी यांची विशेष उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्कर गांधी यांनी या शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, रक्तदान शिबिर, प्रबोधनपर व्याख्याने, वृक्षारोपण अशा होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. वैशाली निंबाळकर व डॉ.रूपाली मोरे यांनी सूत्रसंचालन केले, तर गीत मीनल काळे व अशुमती दहिवडकर या विद्यार्थिनींनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय हर्षदा गात हिने करून दिला. अशुमती दहिवडकर हिने आभार मानले. यावेळी प्रा. स्नेहलता मुळे, प्रा. के. टी. व्हनहुवे, सुरेश दराडे, प्रा. सिकंदर सय्यद, सूर्यकांत दिडवळ, डॉ. वैभव वाघमारे, डॉ. जयसिंग सिंगल, प्रा. वैशाली निंबाळकर, डॉ. आशिष रजपूत, ग्रंथपाल प्रा. अनिल जेवळीकर डॉ. रूपाली मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

संचार सोलापूर, गुरुवार, २४ मार्च २०२२ ५

# झाडबुके महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता

संचार प्रतिनिधी

बार्शी, दि. २३- श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने घेण्यात आलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ पुरी येथे पार पडला.

यावेळी तालुक्यातील खामगाव माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश उपरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर हे होते. सात दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिरामध्ये श्रमदान, गाव स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर इत्यादी उपक्रमांशिवाय विविध विषयांवर व्याख्याने, कवी संमेलन, कीर्तन-भारुड अशा विविध कार्यक्रमातून गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. दरम्यान २२ मार्च रोजी शिबिरामध्ये 'आधुनिक शेती काळाची गरज' या विषयावर राजेंद्र देशमुख यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रा. ए. पी. नंदीमठ हे होते. यावेळी मच्छिंद्र लोंढे उपस्थित होते.

मेजर आरुषा नंदीमठ यांनी हरबल ऑरगॅनिक साबण, डेकोरेटिव्ह बुके बनवण्याची विशेष कार्यशाळा घेतली.

या विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी संस्थेच्या अध्यक्षा प्रभाताई झाडबुके व संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे, प्राचार्य डॉ. मनोज गादेकर व आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काशीद यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबिरासाठी पुरी गावचे सरपंच अमर पवार, उपसरपंच दीपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय. मुलाणी, ग्रामपंचायत कर्मचारी सूर्यकांत दिडवळ यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
सोलापूर. मंगळवार, २२ मार्च २०२२ | फाल्गुन कृ.५, शके १९४३

## दिव्य मराठी एक्सपर्ट व्ह्यू

**प्रा. हमीद काझी**, पर्यावरण अभ्यासक, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी



फ्रीज, एसी यातून क्लोरो फ्लोरो कार्बन गॅस बाहेर पडतो. तो वातावरणातील ओझोन स्तराला धोका पोहोचवतो. सूर्यापासून येणारी अतिनील किरणे पृथ्वीपर्यंत येतात. त्यामुळेही तापमानवृध्दी होते. विविध कारणांमुळे निर्माण होणाऱ्या कार्बन डायऑक्साईड या वायुमुळेही तापमानवृध्दी होते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून तसेच इंधनाचा कमीत कमी वापर करून हे प्रमाण वाढणार नाही याची काळजी घ्यायला हवी. वृक्षारोपणाबरोबर त्याचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे आहे.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी सोलापूर, शुक्रवार, २५ मार्च २०२२

# झाडबुके महाविद्यालयाकडून पुरी येथे श्रमदान, रक्तदान


प्रतिनिधी | बार्शी

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पुरी येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर झाले. प्रमुख पाहुणे म्हणून खामगावच्या माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश उपरे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर होते. या वेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख, ए. पी. नंदीमठ, मच्छिंद्र लोंढे उपस्थित होते.

सात दिवसांच्या या शिबिरामध्ये श्रमदान, गाव स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आदी उपक्रम राबवले. शिवाय विविध विषयांवर व्याख्याने, कवी संमेलन, कीर्तन-भारूड अशा विविध कार्यक्रमातून गावकऱ्यांचे प्रबोधन केले. २२ मार्च रोजी आधुनिक शेती काळाची गरज या विषयावर राजेंद्र देशमुख यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करून उत्पादन वाढवण्याचा कानमंत्र दिला. आरूषा नंदीमठ यांनी हर्बल ऑरगॅनिक साबण, डेकोरेटिव्ह बुके बनवण्याची विशेष कार्यशाळा घेतली.

या शिबिरासाठी संस्थेच्या चेअरमन प्रभावती झाडबुके, संचालिका वर्षा ठोंबरे यांनी शुभेच्छा दिल्या. शिबिरास प्राचार्य डॉ. गादेकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काशीद यांचे मार्गदर्शन लाभले. तसेचं राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्कर गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, प्रा. स्नेहलता मुळे, सुरेश दराडे, डॉ. जयसिंग सिंगल, प्रा. सिकंदर सय्यद, डॉ. रूपाली मोरे, डॉ. आशिष रजपूत, प्रा. वैशाली निंबाळकर यांनी परिश्रम घेतले. सरपंच अमर पवार, उपसरपंच दिपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय. मुलाणी, ग्रामपंचायत कर्मचारी सूर्यकांत दिडवळ यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner



बार्शी : पुरी येथील श्रमसंस्कार शिबिरात स्वच्छता करताना विद्यार्थी.

# विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने घेण्यात आलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ पुरी येथे पार पडला.

खामगावच्या माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश उपरे, मेजर ए. पी. नंदीमठ, मच्छिंद्र लोंढे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर होते. सात दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिरात श्रमदान,. गाव स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर इत्यादी उपक्रमांशिवाय विविध विषयांवर व्याख्याने, कवी संमेलन, कीर्तन-भारुड अशा विविध कार्यक्रमांतून गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर व गिरीश काशीद यांचे मार्गदर्शन लाभले. पुरीचे सरपंच अमर पवार, उपसरपंच दीपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय. मुलाणी, ग्रामपंचायत कर्मचारी सूर्यकांत दिडवळ यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

शिव निर्णय

मंगळवार दि.२२ मार्च २०२२

# समाज घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्वपूर्ण योगदान

शिव निर्णय/ कुसळंब - श्रीम न भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत मौजे पुरी येथे सुरू असलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

ज्यामध्ये गावातील नागरिकांनी,शिबिरातील विद्यार्थ्यांनी आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक मा.डॉ.गुणवंत सरवदे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्धाटन झाले. शिबिरामध्ये सकाळच्या सत्रात योगासने ,प्रभात फेरी, गावाची घडविण्यात सेवा स्वच्छता तर संध्याकाळच्या सत्रात मार्गदर्शनपर व्याख्याने, काव्य संमेलन,किर्तन असे अनेक उपक्रम होत आहेत. या शिबिराचे उद्धाटन मा कृष्णात बोधे मा जी सरपंच पांगरी यांच्या हस्ते झाले. उद्धाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज गादेकर हे होते . शिबिराच्या दुसऱ्या दिवशी युवा व्याख्याते खंडू डोईफोडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मा.धनमंत झालटे उपस्थित होते. '. खंडू डोईफोडे यांनी आपल्या व्याख्यानात त्यांचे जीवन घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे असणारे योगदान व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेतून कशाप्रकारे घडू शकतो याची माहिती दिली. शिबिराच्या तिसऱ्या दिवशी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या काव्य संमेलनात श्री विनोद गादेकर, श्री शाम नवले श्री अरविंद दंगरगेकर श्री दिलीप चौधरी आदी कवींनी आपल्या कविता सादर केल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. शिवाजी झालटे गुरूजी हे होते. कवी संमेलनात सादर झालेल्या सामाजिक कवितांनी गावकरी मंत्रमुग्ध झाले. शिबिराच्या चौथ्या दिवशी 'आजचा तरुण' या या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते धनराज भारती हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. एम. डी. कांबळे (रसायनशास्त्र विभाग प्रमुख) हे होते. आपल्या व्याख्यानात मा.धनराज भारती यांनी देशाला महासत्ता बनविण्यासाठी विदयार्थ्यांची भूमिका कशी महत्त्वाची आहे याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन दिली. विद्यार्थ्यांनी श्रमदान करत गावातील मंदिर सभागृह, गुंठा वस्ती, गटारी व इतर परिसराची स्वच्छता केली.शिबीर सुरू झाल्यापासून डॉ. प्रकाश शिंदे महाविद्यालय परंडा, प्रा. राजशेखर आळगीकर संभाजी शिंदे महाविद्यालय सोलापूर,पांगरी पोलीस स्टेशनचे एपीआय श्री तोरडमल साहेब, श्री विशाल रोंगे झाडबुके इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निकल कॉलेज पुरी अशा अनेक मान्यवरांनी शिबिराला सदिच्छा भेटी दिल्या. शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज गादेकर व


आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ पुष्कर गांधी, प्रा. के.टी.व्हनहुवे डॉ.स्नेहलता मुळे, श्री सुरेश दराडे ,डॉ.जयसिंग सिंगल परिश्रम घेत आहेत. याशिवाय गावचे सरपंच अमर पवार,उपसरपंच सौ.दिपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय.मुलाणी, ग्रामपंचायत कर्मचारी सुर्यकांत दिडवळ यांचे सहकार्य लाभले आहे.

# आदर्शच्या विद्यार्थ्यांचा

शिव निर्णय/कुर्डुवाडी,- उन्हाची वाढती दाहकता आणि पक्ष्यांचे होणारे हाल लक्षात घेऊन आदर्श स्कूलच्या इयत्ता पहिली ते सातवी च्या विद्यार्थ्यांनी घर तिथे पाणवठा असा अनोखा उपक्रम राबवला.

ग्लोबल वार्मिंग,जंगलतोड, औद्योगिकरण यामुळे पक्षांची वरचेवर संख्या घटत चालली असून, चिऊ काऊचे दर्शन दुर्मीळ होत चालले आहे.जंगलातील नैसर्गिक पाणवठे आटले आहेत पाण्यासाठी पक्ष्यांना भटकंती करावी लागत आहे.

पाण्याअभावी तडफडून मरणे असे प्रकारही घडत आहेत. चिमण्या,पारवे,कावळे,घारी, बुलबुल, कोकिळ यांच्यासह अन्य छोटे पक्षी उष्मावाताचे बळी ठरत आहेत.



जिथे घर, तिथे प
ही संकल्पना घेऊन
पक्ष्यांची तहान भागावी म
वस्तूपासून पाण्याची वा
नारळच्या साल, भरए
पाणवठे तयार केले. यामुळ

ज्ञा

त्रणवा
संदेश
राहुल
मार्गद
विभाग

# केम गावात लेक वाचवा अभियान

# झाडबुके महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन



**शिव निर्णय/ कुसळंब :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी राष्ट्रीय सेवा योजने (छडड)मार्फत मौजे पुरी येथे विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१७ मार्च ते२३ मार्च असे सात दिवस चालणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन श्री. कृष्णांत रामचंद्र बोधे (माजी सरपंच पांगरी) यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर हे होते.

या कार्यक्रमासाठी पुरी गावचे सरपंच मा.अमर पवार, प्रा गणेश उपरे, सामाजिक कार्यकर्ते मा.रामेश्वर झालटे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी मा.कृष्णांत बोधे यांनी 'श्रमसंस्कार शिबिर हे विद्यार्थी घडविण्याचे केंद्र असतात' असे म्हटले. श्रमसंस्कारांचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे घेऊन जाण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांनी , विद्यार्थ्यांना श्रमसंस्कार शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगल्या वर्तनातून गावासमोर आदर्श निर्माण करावा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. या विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी संस्थेच्या या श्रमदाना बरोबरच या शिबिरामध्ये

शुक्रवार दिनांक १८ व्याख्यान श्री खंडू डोईफोडे मला घडवणारी राष्ट्रीय सेवा योजना. शनिवार १९ मार्च कवी संमेलन सहभाग- विनोद गादेकर (बार्शी) अरविंद दंगरगेकर (उस्मानाबाद) श्याम नवले (बार्शी) दिलीप चौधरी (उस्मानाबाद). रविवार२० मार्च व्याख्यान मा. श्री धनराज भारती (आजचा तरुण).

सोमवार २१ मार्च मा. श्री ज्ञानेश्वर पाटील श्रीमती गंगूबाई जाधव सौ लक्ष्मी गिराम (भजन/ नाचू कीर्तनाचे रंगी/ भारुड ). मंगळवार २२ मार्च व्याख्यान मा. श्री राजेंद्र देशमुख (आधुनिक शेती काळाची गरज).

रोज रात्री८ ते ९. विद्यार्थी विविध गुणदर्शन कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैशाली निंबाळकर व डॉ.रूपाली मोरे यांनी केले तर स्वागत गीत मीनल काळे व अशुमती दहिवडकर या विद्यार्थीनींनी गायले.

पाहुण्यांचा परिचय हर्षदा गात हिने करून दिला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अशुमती दहिवडकर या विद्यार्थिनीने केले.

या कार्यक्रमासाठी पुरी गावचे विविध क्षेत्रातील मान्यवर व गावचे नागरिक तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व पदाधिकारी व सदस्य, स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. दिपाली उपरे (उपसरपंच पुरी), ग्राम सेवक एम आय मुलाणी,

डॉ पुष्कर गांधी, प्रा. स्नेहलता मुळे, प्रा के.टी.व्हनहुवे, श्री सुरेश दराडे,प्रा.सिकंदर सय्यद ग्रामपंचायत कर्मचारी सुर्यकांत दिडवळ,डॉ.वैभव वाघमारे, डॉ.जयसिंग सिंगल, प्रा. वैशाली निंबाळकर, डॉ. आशिष रजपूत, ग्रंथपाल प्रा. अनिल जेवळीकर, डॉ. रुपाली मोरे, यांनी विशेष परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

## ्कार शिबिर




ार्यक्रमाचे प्रास्ताविक
धिकारी प्रा. दत्तात्रय
ी केले. कार्यक्रमाचे
आणि आभार प्रा.
र यांनी केले.
र्यक्रमाला फडतरी गा-
येथील महाराष्ट्र विद्युत
ार्यालयाचे डोईफोडे,
ाचे सरपंच सौ. निटवे
समन्वयक उपसरपंच
ाटील, सर्व ग्रामस्थ,
विद्यार्थी विद्यार्थिनी

# आधुनिक पद्धतीने शेती ही काळाची गरज : राजेंद्र देशमुख

शिव निर्णय/ कुसळंब- शीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने घेण्यात आलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ मौजे पुरी येथे काल पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माध्यमिक विद्यालय खामगाव चे मुख्याध्यापक मा. शी गणेश उपरे हे लाभले होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर हे होते. या कार्यक्रमासाठी मेजर ए. पी. नंदीमठ ( सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख, शीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी) व मा. मच्छिंद्र लोंढे( ग्रामीण रुग्णालय बार्शी) यांची प्रमुख उपस्थिती होती.



सात दिवसापासून सुरू असलेल्या या शिबिरामध्ये श्रमदान, गाव स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर इत्यादी उपक्रमाशिवाय विविध विषयावर व्याख्याने, कवी संमेलन,किर्तन- भारुड अशा विविध कार्यक्रमातून गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. दि २२ मार्च रोजी शिबिरामध्ये 'आधुनिक शेती काळाची गरज' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून मा. शी राजेंद्र देशमुख तर अध्यक्षस्थानी मा. प्रा. ए. पी. नंदीमठ( सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख झाडबुके महाविद्यालय,बार्शी) हे होते. आपल्या व्याख्यानात मा.राजेंद्र देशमुख यांना आधुनिक पद्धतीने शेती करून शेती उत्पादन वाढवून उत्पन्न वाढविण्याचा कानमंत्र शेतकऱ्यांना दिला. *मेजर आरूपा नंदीमठ यांनी हरवल ऑरगॅनिक साबण , डेकोरेटिव्ह बुके बनवण्याची विशेष कार्यशाळा घेतली.

या विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी संस्थेच्या चेअरमन मा. प्रभाताई झाडबुके व संस्थेच्या संचालिका सौ. वर्षाताई ठोंबरे यांनी शुभेच्छा दिल्या . हे शिबीर पूर्णत्वास नेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर व आयक्यूएसी समन्वयक डॉ. गिरीश काशीद यांचे मार्गदर्शन लाभले.

संपूर्ण शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.पुष्कर गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, प्रा. स्नेहलता मुळे, शी सुरेश दराडे, डॉ. जयसिंग सिंगल, प्रा. सिकंदर सय्यद, डॉ. रुपाली मोरे, डॉ. आशिष रजपूत प्रा. वैशाली निंबाळकर यांनी परिश्रम घेतले तर पुरी गावचे सरपंच अमर पवार, उपसरपंच सौ. दिपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय. मुलाणी, ग्राम पंचायत कर्मचारी सूर्यकांत दिडवळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

जनमत
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव

आसिफ मुलाणी

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात पुरी येथे विविध उपक्रम

## रक्तदान, स्वच्छता मोहीम, प्रभात फेरी, काव्य संमेलन, व्याख्यान

कारी दि.२१ (प्रतिनिधी)- श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत बार्शी तालुक्यातील पुरी येथे सुरु असलेल्या सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात गावातील नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.गुणवंत सरवदे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. शिबिरामध्ये सकाळच्या सत्रात योगासने ,प्रभात फेरी,गावाची स्वच्छता तर संध्याकाळच्या सत्रात मार्गदर्शनपर व्याख्याने, काव्य संमेलन,किर्तन असे अनेक उपक्रम होत आहेत. या शिबिराचे उद्घाटन माजी सरपंच ,ज्येष्ठ पत्रकार कृष्णात वोधे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन कार्य अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज गादेकर हे होते . शिबिराच्या दुसऱ्या दिवशी युवा व्याख्याते खंडू डोईफोडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक धनमंत झालटे उपस्थित होते. खंडू डोईफोडे यांनी आपल्या व्याख्यानात त्यांचे जीवन घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे असणारे योगदान व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेतून कशाप्रकारे घडू शकतो याची माहिती दिली. शिबिराच्या तिसऱ्या दिवशी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या काव्य संमेलनात विनोद गादेकर,शाम नवले, अरविंद दंगरगेकर , दिलीप चौधरी आदी कवींनी आपल्या कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी झालटे गुरुजी हे होते. कवी संमेलनात सादर झालेल्या सामाजिक कवितांनी गावकरी मंत्रमुग्ध झाले. शिबिराच्या चौथ्या दिवशी 'आजचा तरुण' या या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते धनराज भारती हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. एम. डी. कांबळे हे होते.

आपल्या व्याख्यानात धनराज भारती यांनी देशाला महासत्ता बनविण्यासाठी विदयार्थ्यांची भूमिका कशी महत्वाची आहे याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन दिली. विद्यार्थ्यांनी श्रम दान करत गावातील मंदिर सभागृह, गुंठा वस्ती, गटारी व इतर परिसराची स्वच्छता केली.

शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज गादेकर व आय.क्यू.एसी समन्वयक डॉ.गिरीश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ पुष्कर गांधी, प्रा. के.टी.व्हनहुवे, डॉ.स्नेहलता मळे, सुरेश दराडे ,डॉ.जयसिंग सिंगल परिश्रम घेत आहेत. गावचे सरपंच अमर पवार,उपसरपंच दिपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय.मुलाणी, ग्राम पंचायत कर्मचारी सुर्यकांत दिडवळ यांचे सहकार्य लाभत आहे.

Scanned with CamScanner

जनमत
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगांव

आसिफ मुलाणी



# पुरी येथील झाडबुके महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

कारी दि.२७ (प्रतिनिधी)- श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने घेण्यात आलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा बुधवारी (दि२३) समारोप झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गणेश उपरे,ए. पी. नंदीमठ, मच्छिंद्र लोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. सात दिवसापासून सुरू असलेल्या या शिबिरामध्ये श्रमदान, गाव स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर इत्यादी उपक्रमाशिवाय विविध विषयावर व्याख्याने, कवी संमेलन,किर्तन- भारुड अशा विविध कार्यक्रमातून गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. या विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी संस्थेच्या चेअरमन प्रभाताई झाडबुके व संस्थेच्या संचालिका वर्षाताई ठोंबरे यांनी शुभेच्छा दिल्या . शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.पुष्कर गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, प्रा. स्नेहलता मुळे, शसुरेश दराडे, डॉ. जयसिंग सिंगल, प्रा. सिकंदर सय्यद, डॉ. रुपाली मोरे, डॉ. आशिष रजपूत प्रा. वैशाली निंबाळकर यांनी परिश्रम घेतले. पुरी गावचे सरपंच अमर पवार, उपसरपंच दिपाली उपरे, ग्रामसेवक एम. आय. मुलाणी, ग्रामपंचायत कर्मचारी सूर्यकांत दिडवळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी

सोलापूर. शनिवार, ९ एप्रिल २०२२ | चैत्र शु. ८, शके १९४४

# झाडबुके महाविद्यालयात अध्यापन कार्यशाळा उत्साहात



**बार्शी** | येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये आयक्यूएसी विभागाने बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध प्राथमिक शाळांतील शिक्षकांसाठी अध्यापन आणि नियोजन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेतली. अध्यक्षस्थानी मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे होत्या.

तज्ज्ञ साधन व्यक्ती म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, आयक्यूएसी चे समन्वयक डॉ. गिरीश काशिद यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षकांनी लहान मुलांना नेमके कसे अध्यापन करावे, त्याचे नियोजन कसे करावे याविषयी प्रस्तुतीकरण केले. साधन व्यक्तींनी काळानुरूप अध्यापनमध्ये कोणते बदल करावेत, याविषयी सांगितले. संचालिका ठोंबरे यांनी नवीन शैक्षणिक धोरण, बदलते शिक्षण प्रवाह आणि मुले याविषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. चंद्रकांत गायकवाड यांनी केले. याप्रसंगी मुख्याध्यापक किरण तौर, मुख्याध्यापिका एस. एस. नलवडे, सराव मुख्याध्यापिका ए. एस. ढोणे आदी उपस्थित होते. प्रा. मंगेश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संदीप उबाळे यांनी मानले. यासाठी डॉ. वैभव वाघमारे, डॉ. विशाल लिंगायत, डॉ. जयसिंग सिंगल, प्रा. शशिकांत मुळे, प्रा. योगीराज घेवारे, प्रा. वजीर मुलाणी, उमेश मदणे, जितेंद्र गाडे यांनी परीश्रम घेतले.

Scanned with CamScanner


दिव्य मराठी सोलापूर, शनिवार, १६ एप्रिल २०२२

## झाडबुके महाविद्यालय, बार्शी

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. नवनाथ दणाणे होते. हिंदी विभागाचे अनिल गेळे मुख्य वक्ते होते. प्रास्ताविक संदीप उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन मंगेश कांबळे यांनी केले. आभार धनंजय देशमुख यांनी मानले. फलक लेखन उमेश मदने यांनी केले. यासाठी जितेंद्र गाडे यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

सोमवार, ११ एप्रिल २०२२ MY सोलापूर पुढारी ३



बार्शी : झाडबुके महाविद्यालयातील कार्यशाळेप्रसंगी मान्यवर.

# 'अध्यापन आणि नियोजन'वर कार्यशाळा

**बार्शी :** येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी अध्यापन आणि नियोजन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे होत्या. प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, डॉ. गिरीश काशीद यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत संस्थेच्या विविध शाखांमधील प्राथमिक शिक्षकांनी लहान वयोगटातील मुलांना नेमके कसे अध्यापन करावे आणि अध्यापनाचे नियोजन कसे करावे या विषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. चंद्रकांत गायकवाड यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. मंगेश कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. संदीप उबाळे यांनी मानले.

Scanned with CamScanner



बार्शी : झाडबुके महाविद्यालयात सायबरविषयक कार्यशाळेप्रसंगी पोलिस उपनिरीक्षक प्रवीण सिरसाट व इतर.

# मोबाईलचा योग्य वापर करा : सिरसट

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

आज विद्यार्थ्यांच्या हातात असलेला मोबाईल एकप्रकारे बॉम्ब आहे, त्याचा योग्य वापर होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक प्रवीण सिरसाट यांनी केले.

बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व एनएसएस विभागाच्या संयुक्त विद्यमाने सायबर जागरूकता दिनानिमित्त सायबर सुरक्षितता या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आरुषी नंदीमठ होत्या. प्रा. डॉ. मनोज गादेकर, डॉ. गिरीश काशीद आदी उपस्थित होते. सिरसाट म्हणाले, विद्यार्थ्यांना फेक ईमेल, मेसेजेस, फेक आयडी यांच्यामार्फत कशाप्रकारे आर्थिक फसवणूक होते यापासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. जयसिंग सिंगल, सूत्रसंचलन डॉ. स्नेहलता मुळे, तर आभार डॉ. पुष्कर गांधी यांनी मानले. यावेळी प्रा. विजयसिंह पाटील, सय्यद सिकंदर, डॉ. आशिष राजपूत, डॉ. कविता गायसमुद्रे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
शुक्रवार २०.०५.२०२२


# झाडबुके महाविद्यालयात सायबर जागरूकता दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

बार्शी : येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर जागरूकता दिनानिमित्त 'सायबर सुरक्षितता ' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अध्यक्षस्थानी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख मेजर डॉ. आरुषी नंदीमठ होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण सिरसाट, डॉ. आरुषी नंदीमठ , प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, डॉ. गिरीश काशीद यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी डॉ. पुष्कर गांधी, डॉ. रूपाली मोरे, डॉ. जयसिंग सिंगल, डॉ. स्नेहलता मुळे, डॉ. जयसिंग सिंगल, प्रा. सय्यद सिकंदर, डॉ. आशिष राजपूत, डॉ. कविता गायसमुद्रे, डॉ. संजय नाईनवाड, प्रा. विजयसिंह पाटील यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner



बार्शी : झाडबुके महाविद्यालयातील स्नेहमेळाव्याप्रसंगी माजी विद्यार्थी.

# झाडबुके महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**बार्शी :** येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे ऋणानुबंध कायम राहावेत, या उद्देशाने विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शक म्हणून डॉ. गिरीश काशीद हे लाभले. अध्यक्षस्थानी डॉ. जगदीश झाडबुके होते. डॉ. गिरीश काशीद यांनी विद्यार्थ्यांशी मार्गदर्शनपर संवाद साधताना विद्यार्थ्यांना, विद्यार्थी हे समाज व ज्या महाविद्यालयात शिकले त्या महाविद्यालयाचे काही देणे लागतात याची आठवण करून देत समाजातील पुढच्या पिढीसाठी काहीतरी चांगले करण्यासाठी विद्यार्थी मेळाव्यासारखे व्यासपीठ त्यांच्यासाठी उपलब्ध आहे, असे सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. जगदीश झाडबुके यांनी असे विद्यार्थी मिळावे वेळोवेळी घेतले जावेत व माजी विद्यार्थ्यांनीही अशा कार्यक्रमांत सहभागी व्हावे, जेणेकरून महाविद्यालय व माजी विद्यार्थी यांच्यातील ऋणानुबंध अधिक मजबूत होतील, अशी आशा व्यक्त केली. प्राचार्य डॉ. मनोज गादेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पुष्कर गांधी व डॉ. जयराम काशीद यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. सूत्रसंचालन डॉ. रुपाली मोरे, प्रास्ताविक प्रा. विजयसिंह पाटील तर आभार डॉ. पुष्कर गांधी यांनी केले.

Scanned with CamScanner

# गुरुजनांनी केला गुणवंत विद्यार्थ्यांचा घरी जाऊन सत्कार



बार्शी : विद्यार्थ्यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन सत्कार करताना प्राध्यापकमंडळी.

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

'गुरू गुणवंता द्वारी' अभियानांतर्गत श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी येथील बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या निवासस्थानी जाऊन करण्यात आला.

यावेळी संस्थेच्यावतीने गुणवंतांचा सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि फेटा बांधून पालकांसमवेत सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना भावी उच्च शिक्षणासाठी प्रेरणा देणे व मार्गदर्शन करणे हा हेतू होता. यामध्ये कला शाखेतून सौंदरे येथील उकिरडे ऋतुजा नामदेव, नाळे प्लॉट, बार्शी येथील फकीर सना दादामियाँ, शिंदे वैष्णवी मधुकर, पुट्टे श्रीदेवी भागवत आणि काळे काजल शहाजी, तर शास्त्र शाखेतून रणदिवे साक्षी सतीश, हिंदोळे साक्षी संतोष, सुप्रिया घनेश घुले, सुप्रिया मनिष ढेकणे, श्रेया शरद जगताप या विद्यार्थिनींचा समावेश होता. या कार्यक्रमास प्राचार्य मनोज गादेकर, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, गुरुजनवर्ग उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी सोलापूर, शुक्रवार, २४ जून २०२२

# शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक प्रवाहाबरोबर स्वतःस अद्ययावत ठेवावे : ठोंबरे

## श्रीभाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात शिक्षकांसाठी अध्ययन- अध्यापन आणि नियोजन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा, उद्घाटन संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्या हस्ते

**प्रतिनिधी | बार्शी**

शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक प्रवाहाबरोबर स्वतःला अद्ययावत ठेवावे आणि अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांची अभ्यासात गोडी वाढवावी तसेच आपले अध्यापन अधिक प्रभावी आणि रंजक कसे होईल यासाठी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी केले.

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील आयक्यूएसी विभागाच्यावतीने बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी अध्ययन- अध्यापन आणि नियोजन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा १९ जून आयोजित करण्यात आली होती. या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.मनोज गादेकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ.गिरीश काशीद उपस्थित होते.

प्रास्ताविकात काशीद यांनी शिक्षणक्षेत्रातील होणारे बदल आणि त्या अनुषंगाने शिक्षकांनी आपल्या अध्यापन कौशल्यामध्ये करावे लागणारे बदल समजून घेण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले. एकदिवसीय कार्यशाळेस बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या ममता प्राथमिक शाळा, नूतन मराठी विद्यालय, प्रॅक्टिसिंग स्कूल बार्शी या प्राथमिक शाळांमधील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील डॉ. वैभव वाघमारे, डॉ. विशाल लिंगायत, डॉ. जयराम सिंगल, डॉ. संजय नाईनवाड, प्रा. भास्कर करडे, प्रा. वजीर मुलाणी, प्रा.साजीद शेख, प्रा. योगीराज घेवारे, प्रा. संदीप उबाळे, प्रा राहुल माने, प्रा. मनोज गोंदकर, प्रा. गणेश नाकाडे, प्रा. रतिकांत हमणे, श्री शिवाजी पवार, अश्विनी होनमुटे, अंजली भूमकर शिक्षकेतर कर्मचारी जितेंद्र गाडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.मंगेश कांबळे यांनी केले आणि आभार प्रा. संदीप उबाळे यांनी मानले.

Scanned with CamScanner

८ पुढारी शहर-जिल्हा सोलापूर, शुक्रवार, २४ जून २०२२

# झाडबुके महाविद्यालयात प्राथमिक शिक्षकांसाठी कार्यशाळा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील आयक्यू-सी विभागाच्या वतीने बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी रविवार १९ रोजी 'अध्ययन, अध्यापन आणि नियोजन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

याचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्याहस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, समन्वयक डॉ. गिरीश काशीद उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजन हे शिक्षणक्षेत्रातील होणारे बदल आणि त्या अनुषंगाने शिक्षकांनी आपल्या अध्यापन कौशल्यामध्ये करावे लागणारे बदल समजून घेण्यासाठी केले होते.



बार्शी : झाडबुके महाविद्यालयात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना वर्षा ठोंबरे.

ठोंबरे म्हणाल्या, शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक प्रवाहाबरोबर स्वतःला अद्ययावत ठेवावे आणि अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांची अभ्यासात गोडी वाढवावी तसेच आपले अध्यापन अधिक प्रभावी आणि रंजक कसे होईल यासाठी प्रयत्न करावे. या एकदिवसीय कार्यशाळेस बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या ममता प्राथमिक शाळा, नूतन मराठी विद्यालय, प्रॅक्टिसिंग स्कूल बार्शी या प्राथमिक शाळांमधील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील डॉ.वैभव वाघमारे, डॉ.विशाल लिंगायत, डॉ. जयराम सिंगल, डॉ. संजय नाईनवाड, प्रा.भास्कर करडे, प्रा . वजीर मुलाणी, प्रा. साजीद शेख, प्रा .योगीराज घेवारे, प्रा.संदीप उबाळे, प्रा. राहुल माने, प्रा. मनोज गोंदकर, प्रा. गणेश नाकाडे, प्रा. रतिकांत हमणे, शिवाजी पवार, अश्विनी होनमुटे, अंजली भूमकर शिक्षकेतर कर्मचारी जितेंद्र गाडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. मंगेश कांबळे यांनी केले आणि आभार प्रा. संदीप उबाळे यांनी मानले.

Scanned with CamScanner

# बार्शीच्या मेजर नंदीमठ करणार राजपथवर महाराष्ट्राच्या टीमचे संचलन




प्रतिनिधी | बार्शी

भारताच्या प्रजासत्ताकदिनी दिल्ली येथे होणाऱ्या देशाच्या प्रमुख कार्यक्रमात संचलन करण्यासाठी चाचणी शिबिरातून एनसीसी महाराष्ट्र कॉन्टीजनची महाराष्ट्रातील २६ जणांची टीम निवडण्यात आली आहे. बार्शीतील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मेजर आरुषा नंदीमठ-शेटे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात, विवेक बेले, बारामती यांच्या समवेत हे पथक विमान प्रवासाने दिल्लीला रवाना होणार आहे. कर्नल प्रशांत नायर कमांडर ऑफिसर हे नेतृत्व करणार असल्याची माहिती पुणे ग्रुप कमांडर बिग्रेडिअर सुनील लिमये यांनी दिली.

संचलनासाठी निवडलेल्या टीममध्ये मयूर मादेशीय, शुभम सस्ते, प्रिन्सकुमार सिंग, विवेक सिंग, तेजस सोनवणे, अंकित मोरे, तनया नलावडे, कशिष मेथवाणी, जानवी जाधव, ग्यानवी काकोनिया, समृध्दी संत, अमोद मालवी, रामचंद्र चव्हाण, उपकार ठाकरे, सोनाली हुदळे, दीपा पिंपळे, रत्नेश गुप्ता, शिलेदार सिंग, अमोल भालेकर, नीलेश बेलदार, ज्योती रूकवाल, धनंजय मेंढे, सोहम रोहाडे, असिफ शेख, नाजुका कुसराम, आयुष नागपूरकर यांचा समावेश आहे.

संस्थेच्या चेअरमन श्रीमती प्रभावती झाडबुके, संचालिका वर्षाताई ठोंबरे, प्राचार्य डॉ. एच.एस. पाटील आदींनी निवड झालेल्या पथकाला चांगल्या कामगिरीच्या शुभेच्छा दिल्या. मेजर आरुषा नंदीमठ यांचे अभिनंदन केले आहे.

Scanned with CamScanner

सकाळ » TODAY
सोलापूर, शुक्रवार, १८ डिसेंबर २०२० ३

# बार्शीच्या अरुषा शेटे घेऊन जाणार एनसीसी पथक

## प्रजाकसत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनामध्ये सहभाग



अरुषा शेटे

**बार्शी, ता. १७ :** शहरातील ग्लोबल टीचर रणजितसिंह डिसले यांनी जागतिक पातळीवर भारताचा झेंडा फडकवला असतानाच श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या प्राध्यापिका अरुषा शेटे-नंदिमठ या दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त रजपथावर होणाऱ्या संचलनास २६ एनसीसी कॅडेट्सचे पथक घेवून जाणार आहेत. या पथकाचे नेतृत्व कर्नल प्रशांत नायर करणार आहेत.

दिल्ली येथे प्रजासत्ताक दिना निमित्ताने एनसीसी महाराष्ट्र कॉन्टीजनचे पथक दरवर्षी दिल्ली राजपथावर संचलन करत असते. महाराष्ट्रातून एनसीसीच्या पुणे येथील निवड चाचणी शिबीरातून निवडलेले २६ कॅडेट्सचे पथक १८ डिसेंबर २०२० रोजी विमानाने दिल्ली येथे जाणार आहे. या पथकास घेवून जाण्याचा बहुमोलमान बार्शी येथील झाडबुके महाविद्यालयाच्या एनसीसी कंपनी कमांडर मेजर प्रा. अरुषा शेटे-नंदिमठ यांना मिळाला आहे. त्यांच्या सोबत बारामतीचे विवेक बेले देखील असणार आहेत. देशाभरातून आलेल्या एनसीसी पथकातून महाराष्ट्र पथक दरवेळी प्रथम-व्दितीय क्रमांक पटवत आले आहे. यावेळी प्रथम क्रमांक पटकवण्याच्या उद्देशाने हे पथक सज्ज असल्याची माहिती पुणे ग्रुप कमांडर बिग्रेडिअर सुनील लिमये यांनी दिली आहे. कोराना महामारीत बार्शी सारख्या ग्रामीण भागातून प्राध्यापिका अरुषा शेटे यांची प्रजासत्ताक दिनी दिल्लीला संचलनासाठी निवड झाल्याने झाडबुके महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा प्रभाताई झाडबुके, संचालिका वर्षाताई ठोंबरे तसचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर. शुक्रवार, २५ डिसेंबर २०२० | ४

# शिक्षकांसाठी प्राधान्याने काम करू : आसगावकर

प्रतिनिधी । बार्शी

शिक्षकांच्या जुन्या पेन्शनचा प्रश्न प्रलंबित आहे, टप्पा अनुदानासाठी शाळा मूल्यांकन तपासणी समिती रद्द करावी या मागणीसाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहे. शिक्षक म्हणून काम करणारांना वेतन मिळत नसलेल्यांच्या अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. शिक्षकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी माझा पूर्ण वेळ घालवून त्यांच्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याचे प्रतिपादन, नूतन शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी व्यक्त केले.




नुकत्याच झालेल्या निवडणुकीनंतर प्रथमच बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय येथे त्यांनी भेट दिली, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संचालिका वर्षाताई झाडबुके-ठोंबरे, सचिव यू. बी. बेणे, प्राचार्य एच. एस. पाटील, बाबासाहेब पाटील, सुभाष पाटील, आक्काराम पाटील आदी उपस्थित होते.

वर्षाताई ठोंबरे म्हणाल्या, ही निवडणूक वेगळी होती. कोरोनाच्या संकटात जागोजागी बंद असलेल्या शाळा, तीन पक्षांची युती आणि सर्वानुमते सहमती दिलेला उमेदवार, आठ खासदारांच्या कार्यक्षेत्रातील उमेदवार होता. पहिल्या भेटीतही त्यांच्याकडून चांगल्या कामाची अनुभूती आली. सचिन झाडबुके यांनी प्रास्ताविक केले. अनिल गेळे यांनी सूत्रसंचलन व पसायदान गायले. हनुमंत जाधवर, विक्रम टकले, प्रकाश पालके, यांच्यासह अनेक शिक्षण संस्थेचे संचालक, शिक्षक आदी उपस्थित होते.

आमदार आसगावकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस संपर्क कार्यालय, काँग्रेस, दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, राऊत यांचे माऊली मंगल कार्यालय, श्री शिवाजी महाविद्यालय आदी ठिकाणीही सदिच्छा भेटी दिल्या.

Scanned with CamScanner

सकाळ सोलापूर जिल्हा
सोलापूर, शनिवार, २६ डिसेंबर २०२०
३



बार्शी : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात आमदार जयंत आसगावकर यांच्या सत्काराप्रसंगी वर्षाताई ठोंबरे, पी. बी. बेणे, एस. एच. पाटील.

# बार्शीच्या झाडबुके महाविद्यालयात जयंत आसगांवकर यांचा सत्कार

**बार्शी, ता. २५ :** श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांचा सत्कार सचिव पी. बी. बेणे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी वर्षाताई ठोंबरे, सचिन झाडबुके, बाबासाहेब पाटील, हनुमंत जाधवर, सुभाष पाटील, विक्रम टकले, आक्काराम पाटील, प्रकाश पालके, डॉ. एच. एस. पाटील उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात आ. आसगावकर यांचा सत्कार

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात नवनिर्वाचित शिक्षक आ. जयंत आसगावकर यांचा सत्कार करण्यात आला. या स्वागत समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे उपस्थित होत्या.

संस्थेचे सचिव यु.वी. बेणे यांनी संस्थेच्यावतीने सत्कार केला. स्वागत समारंभाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन झाली. आ. जयंत आसगावकर म्हणाले की, आमदारकीचा सहा वर्षांचा हा कार्यकाळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी यांच्या शासन दरबारी प्रलंबित असणाऱ्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मी खर्ची घालणार आहे. झाडबुके परिवाराने केलेला हा सत्कार मी कायम स्मरणात ठेवीन. मला निवडून आणण्यामध्ये आपण सर्वांचे मोलाचे योगदान आहे. यावेळी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध शाखांचे सर्व शिक्षक बंधू-भगिनी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षक अनिल बेळे यांनी केले.

Scanned with CamScanner

सुराज्य
शनिवार, दि. २६ डिसेंबर २०२० 6



# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणार : आ. जयंत आसगावकर

**आमदार आसगावकर यांच्या शिक्षणसंस्थांना भेटी**

✔ सुराज्य/बार्शी

आमदारकीचा सहा वर्षाचा कार्यकाळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या शासन दरबारी प्रलंबित असणा-या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी खर्ची घालणार आहे. अशी ग्वाही नूतन शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी बार्शी येथे दिली. शिक्षक आमदारपदी निवडून आल्यानंतर प्रथमच ते बार्शी तालुक्याच्या दौर्यावर आले होते. शिक्षक नेते बाबासाहेब पाटील, सुभाष पाटील, आप्पाराम पाटील आदी त्यांच्यासमवेत होते. येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, दत्त शिक्षण प्रसारक मंडळ आदी शिक्षणसंस्थांना तसेच राष्ट्रवादी व कॉंग्रेस कार्यालयास त्यांनी भेटी दिल्या.

राष्ट्रवादीचे निरंजन भूमकर, ॲड. विक्रम सावळे यांनी त्यांचे स्वागत केले. बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने संस्थेचे सचिव यु. बी. बेणे यांनी संस्थेच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात आसगावकरांचा सत्कार केला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका वर्षाताई ठोंबरे होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील उपस्थित होते.

यावेळी ठोंबरे यांनी जयंत आसगावकर हे शिक्षक, संस्थाचालक व आमदार असल्याने त्यांना शिक्षणक्षेत्रातील सर्व प्रश्नांची जाणिव आहे त्यामुळे विविध प्रश्नांची ते सोडवणूक करतील. अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन झाडबुके यांनी केले. यावेळी येमाईदेवी विद्यामंदीर कोरफळे येथिल मुख्याध्यापक हनुमंत जाधवर, बार्शी टेक्निकल हायस्कूलचे मुख्याध्यापक विक्रम टकले, नागनाथ विद्यालय यारी चे मुख्याध्यापक प्रकाश पालके, उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक अनिल गळे यांनी केले.

Scanned with CamScanner

२ सोलापूर, रविवार, २७ डिसेंबर २०२० संचार

# शिक्षकांसाठी प्राधान्याने काम करणार

संचार प्रतिनिधी

बार्शी, दि. २६- शिक्षकांच्या जुन्या पेन्शनचा प्रश्न प्रलंबित आहे, टप्पा अनुदानासाठी शाळा मूल्यांकन तपासणी समिती रद्द करावी या मागणीसाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहे. शिक्षकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी माझा पूर्ण वेळ घालवून त्यांच्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याचे प्रतिपादन नूतन शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी व्यक्त केले.

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय येथे त्यांनी सदिच्छा भेट दिली, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संचालिका वर्षा झाडबुके-ठोंबरे, सचिव यू.बी. बेणे, प्राचार्य एच.एस. पाटील, बाबासाहेब पाटील, सुभाष पाटील, आक्काराम पाटील आदी उपस्थित होते.

आमदार आसगावकर म्हणाले, २००५ पूर्वी टप्पा अनुदानावरील शिक्षकांसाठी पेन्शन योजना लागू नव्हती, त्यासंबंधीची १० जुलै २०२० ची पेन्शन योजनेसाठीची अधिसूचना रद्द करण्याचे काम केले. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे मासिक ठोक भत्ता या पध्दतीने करण्याच्या निर्णयाला जोरदार विरोध केला आहे. सगळ्यांसाठी माझा फोन उपलब्ध आहे, कधीही कुठलीही अडचण आल्यास तुम्ही माझ्याशी संपर्क करू शकता असेही त्यांनी यावेळी सांगीतले.

वर्षाताई ठोंबरे म्हणाल्या, ही निवडणूक वेगळी होती, कोरोनाच्या संकटात जागोजागी बंद असलेल्या शाळा, तीन पक्षांची युती आणि सर्वानुमते सहमती दिलेला उमेदवार, आठ खासदारांच्या कार्यक्षेत्रातील उमेदवार होता. पहिल्या भेटीतही त्यांच्याकडून चांगल्या कामाची अनुभूती आली. प्रारंभी सचिन झाडबुके यांनी प्रास्ताविक केले, अनिल गेळे यांनी सूत्रसंचलन व पसायदान गायले. हनुमंत जाधवर, विक्रम टकले, प्रकाश पालाके, यांच्यासह अनेक शिक्षण संस्थेचे संचालक, शिक्षक आदी उपस्थित होते.



बार्शी : बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात आमदार जयंत आसगावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालिका वर्षा झाडबुके-ठोंबरे व अन्य.

Scanned with CamScanner

हॅलो सोलापूर . लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, मंगळवार, दि. २१ डिसेंबर २०२० २



# झाडबुके महाविद्यालयात आसगावकरांचा सत्कार

बार्शी : येथील बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेचे सचिव यू. बी. बेणे यांनी संस्थेच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात नवनिर्वाचित शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांचा सत्कार केला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालक वर्षाताई ठोंबरे होत्या. प्रास्ताविक सचिन झाडबुके यांनी केले. यावेळी बाबासाहेब पाटील, मुख्याध्यापक हनुमंतराव जाधवर, सुभाष पाटील, मुख्याध्यापक विक्रम टकले, प्रकाश पालके उपस्थित होते. आभार प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन अनिल गेळे यांनी केले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी

जडण घडण

# बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ : व्यक्तिमत्त्व घडवणारी संस्था

शहरासह तालुक्यातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाची गरज ओळखून नगरभूषण, माजी नगराध्यक्ष कै. शंकरराव ऊर्फ भाऊसाहेब झाडबुके यांनी २३ जुलै १९५४ रोजी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. संस्थेच्या नूतन मराठी विद्यालयाच्या माध्यमातून शैक्षणिक वाटचाल सुरू झाली. १९५६ मध्ये बेळगाव येथील उच्च विद्याविभूषित प्रभावती यांच्याशी ते विवाहबध्द झाले. त्यांची मातृभाषा कन्नड होती. तरीही कर्नाटकातील विद्यापीठातून मराठी विषयात प्रथम आलेल्या अर्धांगिनी प्रभावतींचा संस्थेच्या उन्नतीसाठी गरज ओळखून त्यांनी त्यांच्याकडे त्याची सूत्रे सुपूर्द केली. त्यानंतर संस्थेचा शाखा विस्तार वाढत गेला. एकाच शैक्षणिक संकुलात प्राथमिक ते पदवीपर्यंतचे शिक्षण उपलब्ध झाले. १९६० मध्ये मुलींच्या उज्वल भविष्यासाठी अध्यापिका विद्यालय, १९६१ मध्ये प्रॅक्टिसिंग स्कूल, १९६१ मध्ये ग्रामिण भागातील मुलींसाठी कस्तुरबा कन्या छात्रालय, मुलांसाठी जवाहर छात्रालय, १९६३ मध्ये माध्यमिक, व्यावसायिक शिक्षणासाठी बार्शी टेक्निकल हायस्कूल, १९६४ मध्ये कोरफळे येथे श्री येमाईदेवी विद्यामंदिर, शिक्षक व शिक्षकेतरांच्या आर्थिक सहाय्यासाठी १९६४ मध्ये बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ नोकरवर्ग सहकारी सोसायटी, १९६९ मध्ये श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, वरिष्ठ, कनिष्ठ कला, विज्ञान व वाणिज्य विभाग, १९७० मध्ये लहान मुलांसाठी ममता बालक मंदिर तर १९७१ मध्ये घारी येथे श्री नागनाथ विद्यालयाची सुरुवात झाली.



परंतु २७ ऑक्टोबर १९७७ रोजी भाऊसाहेब झाडबुके यांचे अकाली निधन झाले. यामुळे संस्थेची पूर्ण जबाबदारी माजी आमदार, नगराध्यक्षा प्रभावती झाडबुके, कन्या वर्षा यांच्यावर येऊन ठेपली. कै. भाऊसाहेबांच्या दूरदृष्टी व मार्गदर्शक तत्त्वांच्या जोरावर संस्थेची वाटचाल अव्याहत सुरूच राहिली. १९९३ मध्ये श्रीमान भाऊसाहेब झाडबुके एचएससी व्होकेशन विभाग, बार्शी टेक्निकल हायस्कूल एचएससी व्होकेशन विभाग सुरू झाला. २००२ मध्ये ममता प्राथमिक शाळा सुरू झाली.

आधुनिक शिक्षणाची गरज ओळखून एमबीए पदवी मिळविलेल्या संस्थेच्या संचालिका वर्षा झाडबुके - ठोंबरे यांनी २००६ मध्ये बीसीए आणि बीबीए विभागाची सुरुवात केली. तंत्रज्ञानाची कास धरत काळानुरूप २०१० मध्ये पुरी येथे संस्थेच्या पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटची सुरुवात केली. तालुक्यातील शिक्षणाच्या ज्ञानगंगेचा लाभ नजीकच्याही तालुक्याला मिळावा यासाठी २०१४ मध्ये करमाळा येथे इंग्लिश मिडीयम स्कूलची सुरुवात केली. २०१७ मध्ये पुरी येथे फार्मसी इन्स्टिट्यूट या औषधनिर्माण शास्त्र शाखेची सुरुवात केली. २०१८ मध्ये करमाळा येथे सेमी प्रिप्रायमरीचे वर्ग सुरू केले. या संस्थेत शिक्षण घेऊन जागतिक पातळीवर नावलौकिक मिळविलेल्या टेनिसपटू कु. प्रार्थना ठोंबरे, धनुर्विद्या पारंगत दीपाली यमगर, वैमानिक कु. साची वाडकर यांच्यासारख्या शेकडो विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात भरारी घेत संस्थेसह शहराच्या नावलौकिकात भर टाकत आहेत. चेअरमन प्रभावती झाडबुके, सचिव यू. बी. बेणे यांच्या योगदानातून संस्थेची यशस्वी शैक्षणिक वाटचाल सुरू आहे.

Scanned with CamScanner

# कोविडमुक्तीसाठी 'एसडब्ल्यू' थेरपी प्रभावी

## बार्शी येथील संशोधक डॉ. सुहास कुलकर्णी यांनी शोधली नवी थेरपी

**सकाळ वृत्तसेवा**

बार्शी, ता. १४ : सध्याच्या कोरोना महामारीत असंख्य रुग्णांचे प्राण ऑक्सिजन अभावी संकटात आले आहेत. याचे मूळ कारण म्हणजे कोरोना व्हायरसमुळे होणारी फुफ्फुसाची हानी व त्यामुळे निर्माण होणारा शरीरातील ऑक्सिजनचा तुटवडा आहे. अशा परिस्थितीत एसडब्ल्यू थेरपीचा वापर केल्याने रुग्णाचे प्राण वाचवता येतील व इतर सहवेदनांमुळे होणाऱ्या त्रासाची तीव्रताही कमी होऊन त्यातून रुग्णांची मुक्तता होऊ शकते, असे मत झाडबुके महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक, सूक्ष्मजीवशास्त्राचे संशोधक डॉ. सुहास कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहे.

डॉ. सुहा कुलकर्णी यांनी सांगितले, की एसडब्ल्यू थेरपी म्हणजे सॅच्युरेटेड वॉटर थेरपी होय. या थेरपीमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा पाण्यामार्फत पोटातून करता येईल. एअरेटरचा (एअरपंप फिशपॉंडमध्ये वापरतात) वापर करून अतिथंड पाण्यात हवा सोडून त्यातील ऑक्सिजन विरघळवता येतो. एक लिटर पाणी सॅच्युरेटेड करण्याकरिता फक्त एक तास लागतो. या पद्धतीने बारा मिलिग्रॅम प्रतिलिटरपर्यंत ऑक्सिजन पाण्यात विरघळवता येतो. त्याचे वास्तविक नैसर्गिक पद्धतीने साध्या पाण्यात हेच प्रमाण फक्त पाच ते सहा मिलिग्रॅम प्रतिलिटर एवढेच असते. अशाप्रकारे तयार केलेले ५०० ते ८०० मिलिलिटर सॅच्युरेटेड वॉटर पिण्यायोग्य थंड असताना रुग्णाला प्यायला द्यायचे आहे. पाणी सकाळी उपाशीपोटी प्यायचे असून पिल्यानंतर पुढील एक ते दीड तास कुठल्याच प्रकारचा व्यायाम अथवा श्रम करायचे नाही. या काळात पाण्याचे शोषण लहान आतड्यांमधील पेशींमध्ये व रक्तामध्ये निष्क्रिय शोषण (पॅसिव्ह अॅब्सॉर्प्शन) या पद्धतीने होते. त्यामुळे साहजिकच रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. ऑक्सिजन पाण्यात जरी कमी प्रमाणात विरघळत असला व रक्तात त्या प्रमाणात पाठवला जात असला तरी शरीरातील ऑक्सिजन तुटवड्याच्या परिस्थितीत ते प्रमाण मोलाचे ठरते. शरीरात अशा प्रकारे पोटातून ऑक्सिजनचा पुरवठा केल्यामुळे फुफ्फुसाकडून होणाऱ्या ऑक्सिजन पुरवठ्याची मागणी कमी होते व त्यामुळे फुफ्फुसाला थोडी का होईना विश्रांती मिळते. याचा फायदा म्हणजे रुग्णाला आलेला थकवा कमी होण्याची शक्यता बळावते.

रुग्णाने या सॅच्युरेटेड थेरपीचा वापर केल्याने लहान आतड्यांतील पेशी अतिकार्यक्षम होऊन पोटातील इतर विकाराच्या त्रासातून देखील रुग्णाची काही प्रमाणात सुटका होण्याची शक्यता वाढते. सॅच्युरेटेड वॉटर थेरपीचे दुष्परिणाम नसल्याने पोस्ट कोव्हिड तसेच घरीच क्वारंटाइन असलेल्या रुग्णांसाठी ही थेरपी प्रभावी ठरू शकते, असे प्रा. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.




डॉ. कुलकर्णी यांनी स्वतःवर प्रक्रिया करून घेतलेले छायाचित्र.

### कोण आहेत डॉ. सुहास कुलकर्णी?



**संशोधक डॉ. सुहास कुलकर्णी हे सूक्ष्मजीवशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक असून, श्रीमान झाडबुके महाविद्यालयाचे सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख होते. मायक्रोबायॉलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय समन्वयक आहेत. मराठी विज्ञान परिषद, शाखा बार्शीचे उपाध्यक्ष आहेत.**

Scanned with CamScanner

कुतूहल
अक्षरातून...क्रांतीकडे..!

आपली बातमी आणि जाहिरातसाठी संपर्क करा
कुतूहल न्यूज नेटवर्क मो - 7020502856, ईमेल - kutuhalnews@gmail.com






ताज्या शैक्षणिक

# श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात वाचन दिन साजरा

June 24, 2021/Editor

**कुतूहल न्यूज नेटवर्क**
**उस्मानाबाद: आसिफ मुलाणी**
बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात शनिवारी (दि. १९) वाचन दिन साजरा करण्यात आला. वाचन दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाचन दिन प्रेरणा व महत्त्व या कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन ग्रंथालय विभागाकडून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील हे होते. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. विशाल लिंगायत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले की वाचन दिनानिमित्त प्रत्येकाने वाचायला हवीत अशा पुस्तकाबद्दल माहिती दिली. ग्रंथपाल अनिल जेवळीकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी डिजिटल ॲप द्वारे आपण वाचनाचा लाभ घेऊ शकतो याबद्दल माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. या ऑनलाईन कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. डॉ. पी. एस. गांधी, डॉ. डोईफोडे मॅडम, प्रा. वाय. बी.मुळे, डॉ. जे.के.काशिद, अनिल वाघमारे, डी. ए.वाघे, पी. सी. पवार, सुरेश दराडे, प्रविण मस्तूद, विक्रम सुरवसे यांच्यासह सहशिक्षक, सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# 'अंनिस'ने केला स्त्री शक्तीचा जागर

संचार प्रतिनिधी

बार्शी, दि. १- येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी व अंधश्रध्दा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने जागर स्त्री शक्तीचा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात नवरात्र उत्सव काळात पाळल्या जाणाऱ्या रूढी परंपरा वर प्रश्नावली काढून त्यावर विवेकवादी उत्तरे लिखीत स्वरूपात विद्यार्थिनींकडून भरून घेण्यात आली.

या कार्यक्रमात १०० मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी प्राचार्य एच. एस.पाटील तसेच अनिसचे विनायक माळी, सोमनाथ वेदपाठक, प्रा. केमदारणे उपस्थित होते. यावेळी अंनिसचे विनायक माळी म्हणाले, समाजात कित्येक रूढी परंपरा आहेत, नवरात्र उत्सव काळात अशा कित्येक परंपरा पाळल्या जातात, ज्या २२ व्या शतकाकडे जात असताना त्रासदायक ठरतात व मानवी प्रगतीच्या नुकसानीस कारणीभूत ठरतात. स्त्री ही पुढारलेली व्हावी असून विवेक जागा व्हावा, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजिका प्रा. डॉ. एस.आर. मुळे, प्रा. डॉ. गासमुद्रे के. एन., प्रा.डॉ. गिरीश काशीद, प्रवीण मस्तूद यांनी परिश्रम घेतले.



बार्शी : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी व अंधश्रध्दा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने जागर स्त्री शक्तीचा हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य एच.एस. पाटील व अन्य.

Scanned with CamScanner

संचार
सोलापूर, शनिवार, ४ जानेवारी २०२० ११

# झाडबुके महाविद्यालयात फूड फेस्टिवलला प्रतिसाद

संचार प्रतिनिधी

बार्शी, दि. ३ - नवीन वर्षाचे औचित्य साधत झाडबुके महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्यावतीने फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले. मुला, मुलींनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मानवाच्या उपयोगी असलेल्या सूक्ष्मजीवांच्या मदतीने तयार झालेले अन्न या फेस्टिवलमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करून मांडले होते. यात वेगवेगळे पदार्थ जसे की, श्रीखंड, ढोकळा, दही, लस्सी, जिलेबी, उत्तप्पा, लोंचे, इडली, आप्पे अशा पदार्थांची रेलचेल होती. सर्व अन्न पदार्थांचा खापय्यांनी आस्वाद घेतला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी अन्न पदार्थ बनताना कोणत्या सूक्ष्मजीवाच्या मदतीने बनला आहे त्याची माहिती देखील सांगितली.

संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एस. पाटील यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम विभागप्रमुख प्रा. अरूषा नंदीमठ-शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. याप्रसंगी प्रा. डॉ. नमिता डोईफोडे, प्रवीण मस्तुद यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी

सोलापूर. सोमवार, १३ जानेवारी २०२० | ३

# झाडबुके महाविद्यालयात सभागृहाचे उद्घाटन



बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील सभागृहाचे शिक्षण सहसंचालक डॉ. राजश्री देशपांडे यांनी उद्घाटन केले.

**प्रतिनिधी । बार्शी**

येथील बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील सभाग्रहाच्या नूतनीकरणाचे बुधवारी उच्च शिक्षणचे विभागीय सहसंचालक डॉ. राजश्री देशपांडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

डॉ. देशपांडे यांनी संस्थेविषयी गौरवोद्गार काढले. तसेच महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी प्रास्ताविकात बहुउद्देशीय सभागृहाची माहिती दिली. अद्ययावत केलेल्या या सभागृहात ६० जणांची बैठक व्यवस्था, प्रोजेक्टर, ध्वनियंत्रणा, विद्युतीकरण आदी सोयी-सुविधा आहेत. या ठिकाणी विद्यार्थी केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. आयसीटीसी लेक्चर, व्हिडिओ कॉन्फरन्स, गटचर्चा, सेमिनार, कार्यशाळा, डिबेट, स्पर्धा, टेक्नोपर्व यासाठी अशा सभागृहाची आवश्यकता होती, ती यामुळे पूर्ण झाल्याने विद्यार्थ्यांची सोय झाली आहे.

या वेळी संचालक वर्षा ठोंबरे, सचिव बापूसाहेब बेणे, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. गिरीश काशिद, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मनोज गादेकर, विद्यार्थी प्रज्योत काटकर यांनी मार्गदर्शन केले. प्रा. अनिल गेळे, डॉ. विशाल लिंगायत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुनील नष्टे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ » TODAY

सोलापूर, रविवार,
★ १९ जानेवारी २०२०

## बार्शीतील झाडबुके महाविद्यालयात प्रदर्शन

**बार्शी :** मेंडेलिवने मांडलेल्या मूलद्रव्यांच्या आवर्तसारणीला १५० वर्षे पूर्ण झाल्याने व संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेत २०१९-२०२० वर्ष आंतरराष्ट्रीय आवर्तसारणी वर्ष म्हणून घोषित केल्यानिमित्त श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आवर्तसारणीवर आधारित भित्तिपत्रक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी केले. प्रदर्शनात बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. गिरीश काशीद, उपप्राचार्य ए. डी. सुर्वे, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. डी. कांबळे, प्रा. वाय. बी. मुळे आदी प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उमेश मदने, अशोक पवार यांनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

सोलापूर, रविवार, ४
★ १९ जानेवारी २०२०

सकाळ » TODAY

## » अवती भवती



बार्शी : पारंपरिक वेशभूषेत भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक.

# झाडबुके महाविद्यालयात पारंपरिक वेशभूषा दिवस

बार्शी : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागाने मकर संक्रांतनिमित्त पारंपरिक वेशभूषा दिवस साजरा केला. बीएस्सीच्या सर्व मुलांनी धोतर व नेहरू शर्ट तर मुलींनी नऊवारी साडी परिधान करून हा दिवस साजरा केला. मकर संक्रांतचे पारंपरिक खाद्य विद्यार्थ्यांनी बनविले होते. त्याचा आस्वाद विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतरांनी घेतला. उद्‌घाटन सोलापूर स्मार्ट सिटी प्रोजेक्टर व निवृत्त कर्नल जगप्रीत बरार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले व देशासाठी सैन्य भरतीसाठी आवाहन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्य व गाणी गाऊन आनंद लुटला. संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांच्या हस्ते सर्वांना तिळगूळ वाटण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. आरूषा नंदीमठ-शेटे यांनी केले. याप्रसंगी डॉ. नमिता डोईफोडे व प्रयोगशाळा कर्मचारी प्रवीण मस्तूद यांनी विशेष परिश्रम घेतले. कुलभूषण कंदले यांनी सूत्रसंचालन केले. नंदिनी करणे हिने आभार मानले.

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात विविध विषयांवर कार्यशाळा

**बार्शी :** बार्शी येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय ग्रंथालय विभागाद्वारे 'ओपन ॲक्सेस ई-रिसोर्सेस व एन.लिस्ट' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी या विषयावर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अनिल आनंदराव जेवळीकर यांनी विद्यार्थ्यांना 'ओपन ॲक्सेस ई-रिसोर्सेस व एन. लिस्ट' या विषयावर विद्यार्थ्यांना त्याचा जास्तीत जास्त वापर आपल्या शैक्षणिक कार्यात कसा करता येईल, याबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस.एम. केमदारणे व भौतिकशास्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रा. आर.एम. मोहिते व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमासाठी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच या कार्यक्रमासाठी प्रा. एम.बी. मुळे, प्रा.डॉ. काशीद, प्रा. काळे-पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश दराडे यांनी केले.

Scanned with CamScanner

# मळेगाव येथे २३ पासून श्रमसंस्कार शिबिर

**बार्शी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर यांच्या अंतर्गत बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास या विषयावर मळेगाव (ता. बार्शी) येथे येत्या २३ जानेवारीपासून विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

याचा प्रारंभ तहसीलदार प्रदीप शेलार, प्राचार्य डॉ. एच.एस. पाटील यांच्या हस्ते व श्री शिवाजी तरुण मंडळाचे संस्थापक बाळासाहेब माळी, सरपंच गुणवंत मुंढे, पं.स. सदस्या जमुना धोत्रे, उपसरपंच उर्मिला गडसिंग, सिद्धेश्वर मुंबरे, 'यशदा'चे शिवाजीराव पवार, गणेश गोडसे, माजी सरपंच संतोष निंबाळकर, पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माळी, अशोक माळी यांच्या उपस्थितीत होणार आहे. ७ दिवसांच्या शिबिरात व्यक्तिमत्व विकासातून राष्ट्रविकास, प्रा. विशाल कदम व मकरंद भुजबळ, ग्रंथ आमुचे साथी, प्रा. अनिल गेळे, सामाजिक काव्य, शंकर कसबे, विनोद गादेकर, हणमंत पडवळ, सामजिक समस्या व उपाय, भारुडवाले जाधव, व्यसनमुक्ती आणि युवक, दीपा देशपांडे यांची व्याख्याने आयोजित केली आहेत.

Scanned with CamScanner

B. Z. MAHAVIDYALAYA LIBRARY ... SHI





**बार्शी : मळेगावातील विशेष श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगेबाबांना अभिवादन करण्यात आले.**

# मळेगाव येथे श्रमसंस्कार शिबिरास सुरूवात

**बार्शी (पुढारी वृत्तसेवा) :** मळेगाव (ता. बार्शी) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास या विषयावर विशेष श्रमसंस्कार शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी एच.एस. पाटील म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांनी ग्राम स्वच्छतेसाठी कॉलेज जीवन विसरून गाव विकासासाठी काम केले पाहिजे. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागही आज प्रगत होत आहे. या शिबिरामध्ये काम करताना वैयक्तिक जीवन विसरून काम करा. यावेळी सरपंच गुणवंत मुंढे, माजी सरपंच सिद्धेश्वर मुंबरे, मुख्याध्यापक लक्ष्मीकांत दीक्षित यांनी मनोगते व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.एच.एस. पाटील, सरपंच गुणवंत मुंढे, माजी सरपंच सिद्धेश्वर मुंबरे, माजी उपसरपंच निजाम शेख, ग्राहक सेवा समितीचे युवक अध्यक्ष अशोक माळी, कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्कर गांधी, प्रा. के.टी. व्हनहुवे, प्रा. डॉ.स्नेहलता मुळे, फिल्डवर्कप्रमुख सुरेश दराडे, आसिफ मुलाणी यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, रा.से.यो. स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते. माजी आ. प्रभाताई झाडबुके व बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रगती शेळके, तर आभार रेश्मा सातपुते यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ TODAY
सोलापूर, रविवार,
२६ जानेवारी २०२०
३

# भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात औषधी वनस्पतींचे प्रदर्शन

**बार्शी, ता. २५ :** येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने पारंपरिक औषधी वनस्पतींचे प्रदर्शन भरवले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. एम. केमदारने व प्रमुख पाहुणे उपप्राचार्य ए. डी. सुर्वे, डॉ. गिरीश काशीद यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी वनस्पती विभागाच्या सहायक प्राध्यापक डॉ. कविता गायसमुद्रे, विभागप्रमुख डॉ. जयराम काशीद यांनी आयोजन केले. परीक्षक म्हणून सूक्ष्म जीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. आरुषा नंदीमठ, प्रा. डी. पी. देशमुख व प्रा. एस. एस. मुळे यांनी काम केले. प्राध्यापक, कर्मचारी, निसर्गप्रेमी व विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहण्यास उपस्थित होते. बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे (झाडबुके) यांनी विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक डॉ. कविता गायसमुद्रे यांनी केले. नंदनी करपे यांनी सूत्रसंचालन केले.



**बार्शी : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात भरवण्यात आलेल्या प्रदर्शनातील औषधी वनस्पतींची माहिती पालकांना देताना विद्यार्थी.**

Scanned with CamScanner

लोकमत सोलापूर, शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२० ३

# विद्यार्थ्यांनी श्रमाबरोबर संस्कारही घ्यावेत

## पाटील : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे मळेगावात श्रमसंस्कार शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

साकत : विद्यार्थ्यांनी श्रमाबरोबरच संस्कारही या शिबिरातून घ्यावेत, असे आवाहन प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी केले.

मळेगाव (ता. बार्शी) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने श्रमसंस्कार शिबीर घेण्यात आले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सरपंच गुणवंत मुंढे, माजी सरपंच सिद्धेश्वर मुंबरे, मुख्याध्यापक लक्ष्मीकांत दीक्षित यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास माजी उपसरपंच निजाम शेख, ग्राहक सेवा समितीचे युवक अध्यक्ष अशोक माळी, कार्यक्रम अधिकारी डॉ. पुष्कर गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, प्रा. डॉ. स्नेहलता मुळे, सुरेश दराडे, आसिफ मुलाणी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

सूत्रसंचालन रासेयोच्या स्वयंसेविका प्रगती शेळके हिने केले तर आभार रेश्मा सातपुते हिने मानले.



बार्शी : झाडबुके महाविद्यालयात आयोजित श्रमसंस्कार शिबिरात महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना सपोनि सचिन हुंदळेकर व इतर.

# श्रमदान शिबिरातील संस्कार आचरणात आणा : हुंदळेकर

**बार्शी :** प्रत्येक विद्यार्थ्यांनि सर्वप्रथम स्वत:पासून स्वच्छता करावी, सामाजिक काम करत असताना एक वेगळा आनंद आपल्याला मिळत असतो. कोणत्याही माणसाची ओळख ही शिक्षणाने नाही तर त्याने केलेल्या कामाच्या कर्तृत्वावर होते. तसेच श्रमदान शिबिरातील संस्कार आणि प्रामाणिकपणा तुमच्या भविष्यातील जीवनाच्या आचरणात आणा, असे पांगरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांनी केले. ते मळेगाव (ता. बार्शी) येथे श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या वतीने आयोजित श्रमसंस्कार शिबिराचा समारोप झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी राष्ट्रसंत गाडगेबाबा व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील, प्रा. एस. आर. मुळे, सिद्धेश्वर मुंबरे, विठ्ठल कोकरे, आसिफ मुलाणी, कोमल मांगडे उपस्थित होते. यावेळी माजी सभापती गंगूताई माळी, श्री शिवाजी तरुण कला, क्रीडा व बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष अंकुश माळी, संतोष निंबाळकर, दिलावर शेख, ज्ञानदेव पवार, अशोक माळी, पो. कॉ. अर्जुन कापसे, किशोर भराडे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. पुष्कर गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, फिल्ड वर्क प्रमुख सुरेश दराडे आदी मान्यवर ग्रामस्थ व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत सोलापूर, शनिवार, दि. २९ फेब्रुवारी २०२० ३

# झाडबुके महाविद्यालयात टेक्नोपर्व; प्रांजली बोकेफोडे ठरली विजेती

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी** : येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील बीसीए व बीबीए या विभागातर्फे टेक्नोपर्व २०२० कार्यक्रम उत्साहात पार पडला. त्यात प्रांजली बोकेफोडे ही 'बेस्ट ऑफ टेक्नोपर्व' सर्वसाधारण विजेती ठरली. तिला संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एच. एस. पाटील होते. प्रास्ताविक विभागप्रमुख नष्टे यांनी केले. टेक्नोपर्व २०२० या स्पर्धेत विद्यार्थ्यांमधील विविध कलादर्शनाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासासाठी पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर, जनरल नॉलेज, प्रोग्रॅमिंग स्कील, बिझनेस प्लॅन, टॅलेंट शो, बुद्धिबळ, रांगोळी, वादविवाद, फॅशन शो अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.



बार्शीच्या झाडबुके महाविद्यालयातील प्रांजली बोकेफोडे हिचा गौरव करताना वर्षा ठोंबरे. बाजूला नष्टे, प्राचार्य पाटील दिसत आहेत.

यासाठी विभागप्रमुख प्रा. सुनील नष्टे, प्रा. अतुल ढवळे, प्रा. युवराज बारबोले, प्रा. अभयसिंह देशमुख, प्रा. राहुल नांदेडकर, प्रा. सोमेश्वर शेटे, प्रा. सुमेध गोलकोंडा, प्रा. सागर खराडे यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. व्ही. एस. साबळे, प्रा. आर. एम. मोहिते, प्रा जे. के. काशीद, प्रा. सिंघल, डॉ. के. एन. गायसमुद्रे, प्रा. वाय. बी. मुळे, प्रा. डी. पी. देशमुख, प्रा. एस. ए. शेख, प्रा. आर. व्ही. जाधव , प्रा. ए. ए. जेवळीकर यांनी काम पाहिले.


Scanned with CamScanner

सकाळ » TODAY
सोलापूर, शनिवार, २९ फेब्रुवारी २०२० ४

# सूक्ष्मजीवशास्त्र विभागतर्फे बार्शीत पालक मेळावा

**बार्शी, ता. २८ :** येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांतील प्रेमाचे नाते दृढ होण्याकरिता पालक मेळावा झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे सहायक संचालक स्थानिक निधी लेखाधिकारी धनराज माने, वरिष्ठ लेखाधिकारी डॉ. वैभव राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. माने यांनी एमपीएसी, यूपीएससीचे ध्येय गाठण्यासाठी जिद्द बाळगण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमात पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

बीएससीच्या विद्यापीठ परीक्षेत यश प्राप्त विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. भित्तिपत्रक स्पर्धा, सूक्ष्मजीव अन्न स्पर्धा, कम्पोस्ट खत निर्मिती, पारंपरिक वेशभूषा, अभ्यास स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रे देऊन सत्कार केला. बेस्ट स्टुडंन्ट ऑफ मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंट म्हणून कुमारी सायली राऊतचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी पालकांना शुभेच्छा दिल्या. सायली राऊत व कुमार कुलभूषण कंगले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. डॉ. नमिता डोईफोडे व कर्मचारी प्रवीण मस्तूद यांनी परिश्रम घेतले.



**बार्शी : भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील पालक मेळाव्यास उपस्थित पालक, प्राध्यापक, विद्यार्थी.**

Scanned with CamScanner

# झाडबुके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिवस समाजशास्त्र विभाग व वुमेन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.

यावेळी प्रा. महादेवी शिकारे यांनी 'महिलाविषयक कायदे' या विषयावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी कार्यक्रमासाठी प्रोत्साहन दिले. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. एच. एस. पाटील हे होते. प्रास्ताविक वुमेन सेलचे समन्वयक प्रा. एस.आर. मुळे यांनी केले. यानिमित्ताने महाविद्यालयात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेमध्ये कोमल मांगडे, शुभांगी कुंभार, प्रियंका कराड, श्रृती कुलकर्णी, प्रियंका पाटील, शुभम कसबे या यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसह बी.ए. मध्ये सर्वाधिक गुण संपादन करणाऱ्या शिल्पा कसबे व रेणुका गायकवाड यांचा सत्कार केला. स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. जे.पी. सिंघल यांनी केले, तर परीक्षण प्रा. डॉ. विशाल लिंगायत, प्रा. के.टी. व्हनहुवे व प्रा. ए.ए. जेवळीकर यांनी केले. कार्यक्रमास डॉ. एन.आर. डोईफोडे, प्रा. ए.पी. नंदीमठ, प्रा. गायसमुद्रे, प्रा. काशीद, प्रा. गादेकर, अनिल वाघमारे, सुरेश दराडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दीपाली कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रा. आनंदी जाधव यांनी मानले.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर, गुरुवार, १२ मार्च २०२० | फाल्गुन कृ.३, शके १९४१

# बार्शीच्या झाडबुके महाविद्यालयात स्पर्धा

## अॅड. शिकारे यांचे महिला कायदेविषयक मार्गदर्शन

प्रतिनिधी | बार्शी

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये समाजशास्त्र विभाग व वुमेन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्या प्रा. अॅड. महादेवी शिकारे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांविषयक कायदे या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच विशेषत: ग्रामीण भागातील महिलांत कायद्यांविषयी जाणीव, जागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

महिलांविषयक नवे कायदे केले जात आहेत. त्याविषयी माहिती लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. एच. एस. पाटील होते. विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्याचे बक्षीस वितरण झाले. निबंध स्पर्धेत प्रथम कोमल मांगडे, द्वितीय शुभांगी कुंभार, वक्तृत्व स्पर्धेत प्रथम प्रियंका कराड, द्वितीय श्रुती कुलकर्णी, सर्वेक्षण स्पर्धेमध्ये प्रथम श्रुती कुलकर्णी, द्वितीय कोमल मांगडे, भित्तीपत्रक स्पर्धेत प्रथम प्रियंका पाटील, द्वितीय शुभम कसबे आल्या. तसेच बी. ए. पदवीमध्ये समाजशास्त्र व संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या अनुक्रमे शिल्पा कसबे व रेणुका गायकवाड यांचाही प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक



बार्शी येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात दीपप्रज्वलनाने महिला दिन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

वुमेन सेलचे समन्वयक प्रा. मुळे एस. आर. यांनी केले. बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सिंघल जे. पी. यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. विशाल लिंगायत, प्रा. के. टी. व्हनहुवे, प्रा. ए. ए. जेवळीकर यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. एन. आर. डोईफोडे, प्रा. ए. पी. नंदीमठ, प्रा. गायसमुद्रे, प्रा. काशीद, प्रा. गादेकर, अनिल वाघमारे, सुरेश दराडे उपस्थित हाते. सूत्रसंचालन प्रा. दीपाली कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा. आनंदी जाधव यांनी मानले.

Scanned with CamScanner

लोकमत
www.lokmat.com



# ऋतुजा भोसले व प्रार्थना ठोंबरेंना उत्कृष्ट कामगिरीचा विश्वास

**आशियाई क्रीडा स्पर्धा | 4 Days to GO**





आव्हान मोठे आहे; पण संघातील इतर दिग्गज खेळाडू सोबत असल्यामुळे त्यांचे मार्गदर्शन खूप मिळत असते. त्यांच्याकडून प्रत्येकवेळी टिप्स मिळत असतात. या स्पर्धेसाठी माझा सराव जोरात सुरु आहे. कोणतीही कसर मी बाकी ठेवणार नाही. दुहेरीत मी प्रांजला यादलापल्ली सोबत खेळणार असल्यामुळे आम्हा दोघींना एकमेकींचा खेळ चांगला माहीत आहे. दोघींचा कोर्टवरील समन्वय चांगल्या प्रकारे जुळलेला आहे, असे पुण्याच्या ऋतुजा भोसले यानी सांगितले. प्रांजलासोबत गेल्या वर्षापासून खेळत आहे. नुकतीच आम्ही थायलंडमध्ये आयटीफ स्पर्धा जिंकली. त्यामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेतील प्रतिस्पर्ध्यांचा खेळ पाहायला मिळाला आहे. कोणता प्रतिस्पर्धी कसा खेळता, याचा अभ्यास दोघीही करीत आहोत. कोर्टवर खेळताना कोणताही दबाव न घेता खेळ करण्याचा आमचा प्रयत्न असतो. खेळताना छोट्या चुका झाल्या किंवा एखादा गुण हातातून गेला तेव्हा आम्ही विनोदी राहून दबाव न घेण्याचा प्रयत्न करतो. जपान, चीन, थायलंड संघ सुद्धा या स्पर्धेत सहभागी होत आहे. मी ४ वर्षे अमेरिकन कॉलेज टेनिस खेळली आहे, तरीसुद्धा आशियाई खेळाडूचा मला चांगलाच अभ्यास आहे. चीनचे खेळाडू जोरदार फटके मारण्यात विश्वास ठेवतात ,तर जपानचे मोठ्या रॅलीवर भर देतात. आशियाई स्पर्धेत भारतीय संघाचे प्रथमच प्रतिनिधित्व करीत आहे. हे माझे स्वप्न पूर्ण झाले. अजून एक स्वप्न आहे.. ऑलिम्पिक स्पर्धेत खेळण्याचे. जकार्ता स्पर्धेतील माझ्या निवडीमुळे आनंद तर झाला आहेच; पण आपल्या संघाला पदक जिंकून दिले, तर तो आनंद द्विगुणीत होईल.

**स्पर्धेतील सुवर्ण पदके - 5**

| पुरुष व महिला एकेरी | पुरुष आणि महिला दुहेरी | मिश्र दुहेरी |
|---|---|---|

**भारतीय संघ**

भारतीय टेनिस संघ (पुरुष):- लिएंडर पेस, रोहन बोपण्णा, रामकुमार रामनाथन, प्रजनेष गुनेस्वरन, दिवीज शरण, सुमीत नागल

भारतीय टेनिस संघ (महिला):- अंकिता रैना, प्रार्थना ठोंबरे, ऋतुजा भोसले, करमान कौर, प्रांजला यादलपल्ली, रिया भाटिया

## प्रार्थना ठोंबरे

गत आशियाई स्पर्धेत सानिया मिर्झा सोबत खेळून पदक जिंकल्यामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला आहे, या वेळी तिला मी मिस करीन. फ्रान्समधील स्पर्धेत मी उपविजेतेपद जिंकले होते. विशेष म्हणजे, ज्या आशियाई खेळाडूंना मी हरविले तेदेखील या स्पर्धेत सहभागी होत आहेत. त्यामुळे खेळताना दडपण नसणार आहे. माझ्या पार्टनर्सची अजून पुष्टी झाली नाही, तरीही मी पदक जिंकण्यासाठी सर्वस्व अपर्ण करीन. या वेळी मिश्र दुहेरीमध्ये खेळणार आहे, रोहन बोपण्णा सोबत खेळण्याची शक्यता जास्त आहे. वर्षभर आम्ही वैयक्तिक म्हणून खेळतो; पण आशियाई स्पर्धेमध्ये खेळण्याचा वेगळा अनुभव असतो. इथे टीम म्हणून आम्ही खेळतो, टीम मधल्या खेळाडूचा आधारदेखील खूप असतो आणि योग्य वेळी ते प्रेरणा देतात. रोजची तयारी आणि सामन्या अगोदरची तयारी कशी केली पाहिजे, सामना संपल्यानंतर कशी रिकव्हरी केली पाहिजे, सामन्यामध्ये महत्त्वाच्या क्षणी काय अपेक्षित केले पाहिजे? मागच्या आशियाई स्पर्धेत आम्ही उपांत्य फेरीत चीन (तैपेई)च्या खेळाडूंकडून हरलो, चीन (तैपेई) चे आव्हान तर आहेच, त्याच बरोबर जपान, चीन, थायलंड यांच्या कडूनसुद्धा आव्हान अपेक्षित करीत आहे.

१९५८ मध्ये आशियाई क्रीडामध्ये टेनिसचा समावेश झाल्यापासून भारताने टेनिसमध्ये आतापर्यंत २९ पदके जिंकली आहे, त्यात ८ सुवर्ण, ६ रौप्य, १५ कांस्य पदकांचा समावेश आहे.नवीन नियमाप्रमाणे आशियाई क्रीडामध्ये सुवर्णपदक मिळून थेट टोकियो ऑलिम्पिक्साठी प्रवेश मिळेल यामुळे ही स्पर्धा महत्त्वाची झाली आहे. नेहमीप्रमाणेच तैपेई (चीन), चीन, जपान, उझबेकिस्तान यांचे आव्हान तर आहेच; पण भारतीय टेनिस दल सगळ्यांना तोंड देण्यास सक्षम आहे. रामकुमार रामनाथनवर एकेरीत पदक मिळवण्याचे दारोमदार असणार आहे. रामनाथनकडून पदकाची अपेक्षा नक्कीच आहे. रामनाथन सोबत प्रजनेष गुनेस्वरनसुद्धा एकेरीत सहभाग करणार आहे.

४५ वर्षीय लिएंडर पेस दुहेरीत खेळणार आहे, त्याने आतापर्यंत आशियाई क्रीडा मध्ये ५ सुवर्णपदकांसह एकून सात पदके जिंकली आहे. भारताचा प्रशिक्षक जिशान अलीने रामनाथनसोबत लिएंडरचे खेळण्याचे संकेत दिले आहे. लिएंडर मिश्र दुहेरीत अंकिता रैनासोबत खेळणार आहे. अंकितासुद्धा उत्तम फॉर्ममध्ये आहे, दोघेही मिश्र दुहेरी पदक जिंकण्याचे प्रबळ दावेदार आहे. रोहन बोपण्णा यंदा दिवीज शरण सोबत खेळणार आहे. दिवीजनेची दुहेरीत रँकिंग सध्या ३६ आहे. डावखुरा दिवीज आणि उजव्या हाताचा बोपण्णाची जोडी प्रतिभाशाली असणार आहे आणि सुवर्णपदक जिंकण्याचे प्रबळ दावेदार आहे.

- शब्दांकन : अभिजित देशमुख

**आशियाई स्पर्धेतील भारताची कामगिरी**

- २९: भारताने जिंकलेली एकून पदके
- ८: भारताने जिंकलेली सुवर्णपदके
- ५: भारताने २०१४ मध्ये जिंकलेली पदके
- ७: लिएंडर पेसने जिंकलेली पदके

महाराष्ट्राच्या प्रार्थना ठोंबरे आणि ऋतुजा भोसले यांचादेखील आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभाग असणार आहे.

Scanned with CamScanner

लोकमत
www.lokmat.com
सोलापूर, मंगळवार,
दि. २१ ऑगस्ट २०१८


# झाडबुके महाविद्यालयात रंगनाथन जयंती

बार्शी : येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या ग्रंथपाल विभागात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. प्रा. एम. बी. गादेकर यांची उपस्थिती होती. यावेळी ग्रंथप्रदर्शन व स्पर्धा परीक्षा असे दोन उपक्रम घेण्यात आले. प्रा. गादेकर यांनी स्पर्धा परीक्षेच्या स्वरुपाबाबत व इतर परीक्षेबाबतची माहिती दिली तर प्राचार्य डॉ.एस.एच. पाटील यांनी शिक्षण संशोधन आणि ग्रंथालय यांचे अचूक नाते कसे असते याबाबत विचार मांडले. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ए. ए. जेवळीकर यांनी रंगनाथन यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी प्रा. एस. एम. केमदारणे, प्रा. व्ही. एस. साबळे, प्रा. एच. के. कांबळे, डॉ. एन. आर. दणाने, डॉ.जे.के.काशीद, प्रा.शशिकांत मुळे, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner


MY सोलापूर २ पुढारी
गुरुवार
२३ ऑगस्ट २०१८

# 'झाडबुके' येथे डॉ. रंगनाथन जयंतीनिमित्त कार्यक्रम

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयामध्ये ग्रंथालय विभागाच्यावतीने ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या १२६ व्या जयंतीनिमित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एस. पाटील होते. प्रमुख पाहुणे इंग्रजी विभागचे प्रमुख डॉ.एम.बी. गदेकर हे होते. या कार्यक्रमानिमित्त ग्रंथ प्रदर्शन व स्पर्धा परीक्षा मागदर्शन अशा दोन उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. कार्यक्रम ग्रंथालय विभागाच्या इमारतीमध्ये विद्यार्थी वाचन कक्षात पार पडला. कार्यक्रमांमध्ये प्रा. डॉ. एम. बी. गदेकर यांनी विद्यार्थांना स्पर्धा परीक्षेच्या स्वरूपाबाबत तसेच विविध परीक्षांबाबत माहिती दिली. अध्यक्ष डॉ. एच. एस. पाटील यांनी शिक्षण, संशोधन आणि ग्रंथालय यांचे असणारे अचूक नाते यावर भाष्य केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये ग्रंथपाल प्रा. जेवळीकर यांनी डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालयीन कर्मचारी सुरेश दराडे यांनी केले. आभार विजयकुमार खताळ यांनी मानले मार्गदर्शनपर कार्यक्रमानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ प्राध्यापक एस.एम. केमदारणे, प्रा. व्ही. एस. साबळे, डॉ. एच.के. कांबळे, डॉ. एन.आर. दणाने, उपस्थित होत.



**बार्शी : डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यात आले.**

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर, शुक्रवार, २४ ऑगस्ट २०१८

# झाडबुके महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शनात पावसाळी रानभाज्या


प्रतिनिधी । बार्शी



येथील भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार, दि. २१ रोजी विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले. विज्ञान प्रदर्शनाची संकल्पना 'रानभाज्या प्रदर्शन २०१८' अशी होती. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील व प्रमुख पाहुणे उपप्राचार्या पी. ए.पाटील व हिंदी विभाग प्रमुख डॉ. गिरीश काशीद यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी पावसाळ्यात नैसर्गिक आढळणाऱ्या स्थानिक रानभाज्याची शास्त्रोक्त माहिती दिली.

३० रानभाज्या व त्या ८० प्रकारचे पदार्थ (मेनू) बनवून आणले होते. प्रत्येक पदार्थ व त्याची कृती त्या कशा प्रकारे बनवायच्या? साहित्य काय पाहिजे? त्याचा उपयोगी भाग कोणता? (रेसिपी), उपयुक्त व या भाज्यामध्ये कोणकोणती पोषक तत्त्वे असतात, त्या आरोग्यासाठी किती महत्त्वाची असतात याचा शास्त्रीय चार्ट बनवून समजावून सांगितले. वनस्पती विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. कविता गायसमुद्रे, विभाग प्रमुख डॉ. जयराम काशीद यांनी प्रदर्शनाचे आयोजन केले. परीक्षक म्हणून सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर सुहास कुलकर्णी, प्रा.पी.जे. मडजे यांनी काम केले. सर्व प्राध्यापक, कर्मचारी, पालक निसर्गप्रेमी व विद्यार्थी उपस्थित राहिले.

Scanned with CamScanner



बार्शी : श्रमसंस्काराच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# मळेगाव येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा प्रारंभ

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

बार्शी येथील झाडबुके महाविद्यालयाचे जलसंधारणासाठी युवक या विषयावर राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन मळेगाव येथे करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्‌घाटन राजकुमार मुंबरे यांच्या हस्ते व मळेगावचे सरपंच गुणवंत मुंढे, झाडबुके महाविद्यालयाचे प्राचार्य एच.एस. पाटील, यशदाचे शिवाजी पवार, जयसिंग भानवसे, सिद्धेश्वर मुंबरे, निजाम शेख, हरिश्चंद्र नलावडे, भाऊसाहेब म्हमाणे, सावता परिषदेचे युवक अध्यक्ष अशोक माळी, अभिमान गडसिंग आदी यावेळी उपस्थित होते. यशदाचे शिवाजी पवार, माजी सरपंच सिद्धेश्वर मुंबरे, हरिश्चंद्र नलावडे, राजकुमार मुंबरे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विशाल लिगायत यांनी केले व आभार प्रा. जयसिंग सिंगल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी पुष्कर गांधी, के.टी. व्हनहुवे, डॉ. स्नेहलता मुळे, सुरेश दराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरामध्ये १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

Scanned with CamScanner

संचार सुप्रभात

सोलापूर, बुधवार, ३० जानेवारी २०१९



▶ बार्शी : श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील मुलांनी मळेगाव येथे गावकऱ्यांसाठी स्वच्छता अन् शोषखड्डे घेण्याची मोहीम सुरु केली आहे.

# मळेगावमध्ये गावाची केली स्वच्छता अन् घेतले शोषखड्डे

## बार्शीच्या झाडबुके महाविद्यालयाचा उपक्रम

संचार प्रतिनिधी

▶ बार्शी, दि. २९ - श्रमाशिवाय संस्कार नसतो आणि म्हणूनच श्रमसंस्कार शिबिरातून तरुणांमध्ये सेवाभाव रुजविण्याचा प्रयत्न महाविद्यालयीन स्तरावर अनेक वर्षांपासून सुरु आहे. येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयदेखील याला अपवाद राहिलेले नाही. म्हणूनच तालुक्यातील मळेगाव येथील तलाव स्वच्छतेपासून ते गावाची स्वच्छता तसेच शोषखड्डे घेण्याचे काम या तरुणांनी उत्स्फूर्तपणे केले आहे. काम करणारे अन् कामाचे नाटक करणारे यापैकी पहिल्या प्रकारातील ही मुले असल्याचे मळेगावनेही मान्य केले आहे.

दरवर्षी श्रमसंस्कार शिबिर केवळ औपचारिकता म्हणून न घेता मुलांमध्ये समाजसेवेचा, श्रमाचा विचार खोलपर्यंत रुजावा यासाठी अनेक वर्षांपासून झाडबुके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी मळेगाव येथे जाऊन मनापासून काम करीत राहिले आहेत. बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मुख्य मार्गदर्शक तथा माजी आमदार प्रभाताई झाडबुके तसेच संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मुले अशा श्रमसंस्कार शिबिरांमध्ये मनापासून काम करीत आली आहेत.

याहीवर्षी मळेगाव याच गावी ही मुले गेली आणि गतवर्षी केलेल्या कामाच्या पुढील कामास प्रारंभ केला. गावातील तलाव आधी स्वच्छ पान ४ वर

### मळेगावमध्ये गावाची...

केला, यानंतर गाव स्वच्छ करण्यासाठी या मुलांनी हातात झाडू घेत गावकऱ्यांनाही स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. विशेष म्हणजे शौचालयासाठी आवश्यक असलेले शोषखड्डेही याच मुलांनी घेतले. २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत एकाबाजूला मुलांच्या उपक्रमातील ही कृतिशीलता तर दुसऱ्या बाजूला गावकऱ्यांनाही काही तरी वैचारिक मेजवानी असावी म्हणून विविध विषयांवरील चिंतनाचे कार्यक्रमही ठेवण्यात आले. ५०० ठिकाणी मुलांनी वृक्षारोपणही केले. या उपक्रमाचा शुभारंभ राजकुमार मुंबरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गावचे सरपंच सिध्देश्वर मुंबरे तसेच प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांच्यासह कार्यक्रम अधिकारी प्रा. पुष्कर गांधी, प्रा. के. टी. व्हनहुवे, प्रा. एस. आर. मुळे, डॉ. जयसिंग सिंगल उपस्थित होते. फिल्डवर्कर म्हणून प्रा. सुरेश दराडे यांच्याकडे जबाबदारी आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अशोक माळी, हरिश्चंद्र नलावडे आदींचे सहकार्य मिळाले.

Scanned with CamScanner



बार्शी : श्रमदान करताना विद्यार्थी.

# मळेगाव येथे रासेयोचे शिबिर उत्साहात

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

मळेगाव, ता. बार्शी येथे सुरू असलेले श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप नुकताच झाला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एच.एस. पाटील होते.

यावेळी एन.एस.एस.चे संचालक एम.एस. धोकटे, विकास मोरे, माजी सभापती गंगुताई माळी, मळेगावचे सरपंच गुणवंत मुंढे, शिवाजी तरुण मंडळाचे अध्यक्ष अंकुश माळी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दिलावर शेख, ग्रामसेवक शिवाजीराव गायकवाड, माजी उपसरपंच भाऊसाहेब म्हमाणे, प्रमोद मुंढे, सावता परिषदेचे युवक अध्यक्ष अशोक माळी आदी उपस्थित होते.

सात दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये 'जलसंधारणातील युवकांची भूमिका', 'जलसंधारण व पाणीटंचाई', 'चला बोलूया, यशस्वी होऊया', 'स्वच्छता, आरोग्य आणि विकास', 'गर्भसंस्काराच्या उद्याच्या भारतासाठी' आदी विषयावर व्याख्याने पार पडली. शिबिरात मळेगाव तलावाची स्वच्छता, अंतर्गत गटारी स्वच्छता, शोषखड्डे आदी कामे पूर्ण करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. पुष्कर गांधी, प्रा. व्हनहुवे के. टी., प्रा. मुळे एस. आर., डॉ. जयसिंग सिंगल, प्रशांत पटणे, नागेश गाभने, सुशांत आंधळकर आदींनी परिश्रम घेतले. मळेगाव ग्रामपंचायतीचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

लोकमत सोलापूर, रविवार, दि. १७ मार्च २०१९



# बार्शीत उद्या होणार मानवी हक्क कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

बार्शी : राष्ट्रीय मानव अधिकार आयोग व श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातर्फे मानवी हक्क या विषयावरील १८ मार्च रोजी एकदिवसीय कार्यशाळा होणार असल्याचे प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी सांगितले.

उद्घाटन न्या. आर. एस. पाटील करणार आहेत. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षाताई ठोंबरे राहणार आहेत. यावेळी प्रा. ज्योती वाघमारे, श्रीकांत कांबळे, प्रा. मोहन कटाप, ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ, ॲड. अनिल पाटील, स्मिता देशपांडे हे मार्गदर्शन करणार आहेत.



Scanned with CamScanner

दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
सोलापूर, सोमवार, १८ मार्च २०१९

## बार्शीत आज 'मानवी हक्क'वर कार्यशाळा

बार्शी । राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १८) सकाळी साडेनऊ वाजता मानवी हक्क प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहे. न्यायाधीश आर. एस. पाटील यांच्या हस्ते याचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी वर्षा ठोंबरे असतील. यात ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ, ॲड. अनिल पाटील, प्रा. मोहन कटाप, स्मिता देशपांडे, प्रा.ज्योती वाघमारे, दिव्य मराठीचे वृत्तसंपादक श्रीकांत कांबळे मार्गदर्शन करणार असल्याची माहिती, प्राचार्य डॉ. एच. एस. पाटील यांनी दिली.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी





मानवी हक्क प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी न्यायाधीश पाटील.

# कायद्याने कैद्यांना मूलभूत हक्क आहेत : न्या.पाटील

प्रतिनिधी | बार्शी

मानवी हक्कांचा पहिला जाहीरनामा सन १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या जनरल ॲसेम्ब्लीमध्ये स्वीकृत करण्यात आला. एखाद्या प्रसंगातून संशयित असलेल्या कच्च्या कैद्यावरही कोणाला अन्याय करता येणार नाही, कायद्यानुसार कैद्यासाठीही मूलभूत हक्क दिले जातात, असे प्रतिपादन बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधिश आर. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

नॅशनल ह्युमन राइट्स कमिशन, न्यू दिल्ली आणि श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या एकदिवसीय मानवी हक्क प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. तज्ज्ञांकडून चार सत्रांतून या वर्कशॉपमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. याबेळी संस्थेच्या संचालिका वर्षाताई ठोंबरे, ॲड. दिनेश श्रीश्रीमाळ, प्राचार्य एच.एस. पाटील, व्ही. ए. पाटील, के. टी. व्हनहुवे, डॉ. व्ही. पी.लिंगायत, पुष्कर गांधी आदी उपस्थित होते. न्या.पाटील म्हणाले, प्रत्येक मानवाच्या किमान जगण्याचा दर्जा निश्‍चित करून त्यानुसार त्यांना हक्क मिळवून दिले जावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. १९८० च्या दशकातही सुनिल बात्रा यांच्या केसमध्ये निर्णय देतांनाही मानवी हक्काचा विचार केला आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे भविष्य असल्याने त्यांना मानवी हक्काबद्दल ज्ञान व्हावे, त्यांच्या ज्ञानातून समाजातील वंचितांचे प्रश्न सुटावे हा या वर्कशॉपचा उद्देश आहे.

Scanned with CamScanner

दैनिक दिव्य मराठी

# सोलापूर जिल्हा

सोलापूर, बुधवार, २० मार्च २०१९

LIBRARY BARSI

**दिव्य मराठी विशेष** • प्रा. ज्योती वाघमारे यांचे प्रतिपादन, बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात मानवी हक्क प्रशिक्षण कार्यशाळा

## स्त्रियाच स्त्रीविरोधी असल्याचे चित्र रंगवणे ही विकृत मानसिकता

प्रतिनिधी । बार्शी



स्त्रियाच स्त्रीविरोधी असल्याचे चित्र रंगवणे हे विकृत मानसिकतेचे लक्षण असल्याचे प्रतिपादन सोलापूरच्या प्रा. ज्योती वाघमारे यांनी केले.

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय आणि राष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय मानवी हक्क प्रशिक्षण कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

प्रा. वाघमारे म्हणाल्या, महिलांना लक्ष्य करून विडंबन होत आहे. स्त्रियांना देवत्वाची उपमा दिली जाते. त्याच मंदिरात स्त्रियांना प्रवेश नाकारले जाते. महिलांनाच त्यांचे हक्क, अधिकार समजावून सांगण्याची गरज आहे. मुलींनी पार्लरमध्ये जाऊन सुंदर होण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी जीममध्ये स्वतःचे शरीर घडवण्याची, स्वसंरक्षणाचे धडे गिरवण्याची गरज आहे. प्रत्येक देशात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. युनोने जागतिक स्तरावर भेदभाव करणारे कायदे काढून टाकण्यास सांगितले. महिलांचे संरक्षण, समान न्याय, समतेची गती वाढवणे, वंशपरंपरेने चालत आलेल्या वाईट चालीरीती व परंपरा बंद करणे ही कर्तव्ये आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रगत राष्ट्रांच्या आधी ते अधिकार मिळवून दिले. 'दिव्य मराठी'चे वृत्तसंपादक श्रीकांत कांबळे यांनीही मार्गदर्शन केले. ॲड. अनिल पाटील म्हणाले, न्यायालयाची पायरी चढू नये, असे म्हणण्याची वेळ आता नाही. आपण ज्या भूमीत राहतो तेथील कायद्यांची माहिती असणे आवश्यक आहे. जन्म, मृत्यूच्या नोंदी नसतील तर मालमत्तेच्या समस्या निर्माण होतात. कोणत्याही शाखेचा अभ्यास करणाऱ्यांना कायद्यांचे किमान ज्ञान आवश्यक आहे. चांगली माणसे, चांगली पुस्तके यांच्या सहवासात राहा. वैशिष्ट्यपूर्ण, प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व असलेल्या नेपोलियन बोनापार्ट यांच्यावर जगातील सर्वाधिक पुस्तके लिहिली गेली आहेत.



### चांगल्या पुस्तकांचे वाचन करा



स्मिता देशपांडे म्हणाल्या, दुसऱ्या महायुध्दापासून हक्काची चळवळ सुरू झाली. प्रसारमाध्यमे, शिक्षणामुळे प्रत्येक गोष्टीचे ज्ञान होत आहे. विद्यार्थी संघटना, कैदी यांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी यू ट्युब आणि फेसबुकऐवजी चांगल्या पुस्तकांच्या वाचनामध्ये आपला वेळ घालवल्यास त्याचा चांगला परिणाम दिसून येईल. आयोगाची रचना व कार्य सांगत जगभरात कार्यरत संस्थांचा आढावा त्यांनी मांडला.

### शिक्षणातून क्रयशक्ती वाढावी



मोहन कटाप म्हणाले, जागतिकीकरणानंतर भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे परिणाम दिसत आहेत. स्त्री व्यापार, अतिरेकी कारवाया आणि सामान्यांचे खच्चीकरण होण्याचे प्रमाण वाढत आहे. १९९२ नंतर गरीब आणि श्रीमंतांची दरी वाढली. शिक्षण हे केवळ पदवी मिळवून देण्याचा कारखाना न बनता यातून मानवी क्रयशक्ती वाढावी. राष्ट्राला उपयुक्त समाज निर्माण व्हावा. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न व्हावेत. बालपणापासून व्यवसायांचे संस्कार असल्याने चीनची मुले विविध इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे तयार करतात. आपली मुले मोबाइलमध्ये गुंतली आहेत.

Scanned with CamScanner

संचार
सोलापूर, सोमवार २५ मार्च २०१९ ९

# कायद्यानुसार कैद्यासाठीही मूलभूत हक्क : न्या. पाटील

## झाडबुके महाविद्यालय, नॅशनल ह्युमन राइटस् यांचा संयुक्त उपक्रम

संचार प्रतिनिधी

बार्शी, दि. २४ - मानवी हक्काबाबतचा विचार ऐंशीच्या दशकापासून ते आजपर्यंत तितकाच महत्त्वाचा मानला गेला आहे. कायद्यानुसार कैद्यालाही मूलभूत हक्क दिले जातात, असे मत न्यायाधीश आर.एस. पाटील यांनी व्यक्त केले.

दिल्लीच्या नॅशनल ह्युमन राइटस् कमिशन आणि श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या एकदिवसीय मानवी हक्क प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन न्यायाधीश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. तज्ज्ञांकडून चार सत्रातून या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. व्यासपीठावर यावेळी संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे, अॅड.दिनेश श्रीमाळ, प्राचार्य एच.एस.पाटील, व्ही.ए.पाटील, के. टी.व्हनहुवे, डॉ.व्ही.पी.लिंगायत, पुष्कर गांधी आदी उपस्थित होते.




बार्शी: मानवी हक्क प्रशिक्षण कार्यशाळेत न्यायाधीश आर.एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी वर्षा ठोंबरे, अॅड.दिनेश श्रीमाळ, प्राचार्य एच.एस.पाटील, के.टी.व्हनहुवे, डॉ.व्ही.पी.लिंगायत, पुष्कर गांधी व अन्य.

या एकदिवसीय कार्यशाळेत मोहन कटाप, श्रीमती स्मिता देशपांडे, प्रा.ज्योती वाघमारे व श्रीकांत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मोहन कटाप म्हणाले, एकविसाव्या शतकाची वाटचाल सुरू असताना मानवी हक्क अधिकाराची चर्चा जगभर सुरू आहे. ग्लोबलायझेशननंतर भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे परिणाम दिसत आहेत. गुन्ह्यातील स्त्री व्यापार, अतिरेकी कारवाया तसेच सामान्यांचे खच्चीकरण होण्याचे प्रमाण वाढत आहे. स्मिता देशपांडे म्हणाल्या, दुसऱ्या महायुध्दापासून हक्काची चळवळ सुरू झाली. प्रसारमाध्यमे, शिक्षणामुळे प्रत्येक गोष्टीचे ज्ञान होत आहे. विद्यार्थी संघटना, कैदी यांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी यूट्युब आणि फेसबुकऐवजी चांगल्या पुस्तकांच्या वाचनामध्ये आपला वेळ घालविल्यास त्याचा चांगला परिणाम दिसून येईल.

ज्योती वाघमारे म्हणाल्या, एकविसाव्या शतकात एकीकडे महिलांच्या गौरवाच्या विचारांचे प्रदर्शन होते तर त्याचवेळी स्त्रियाच स्त्रियांचे विरोधी असल्याचे चित्र रंगवून विकृत मानसिकतेचे चित्र दिसून येते. अशा रितीने महिलांना टार्गेट करून विडंबन होत असेल तर आजही मानव अधिकाराची गरज असल्याची जाणीव होते. मानव अधिकाराच्या माध्यमातून स्त्रियांनाही सन्मानाने जगण्याचा अधिकार असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रगत राष्ट्रांच्या अगोदर ते अधिकार मिळवून दिले. यामुळे त्याचा अभिमान वाटतो.

निरोप समारंभात मार्गदर्शन करताना अॅड.अनिल पाटील म्हणाले, कोर्टाची पायरी चढू नये, असा काळ आता बदलला आहे. आपण ज्या भूमीत राहतो तेथील कायद्यांची माहिती असणे आवश्यक आहे. संस्थेच्या संचालिका वर्षा ठोंबरे यांनी या कार्यशाळेत सहभागींचे स्वागत व सत्कार केला.

Scanned with CamScanner

जिल्हा ८ पुढारी | सोलापूर, गुरुवार १७ ऑगस्ट २०१७

# डॉ. रंगनाथन यांना अभिवादन

**बार्शी (तालुका प्रतिनिधी ) :** बार्शी येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुकेमहाविद्यालयातील ग्रंथालय व इंग्रजी विभाग यांच्यावतीने डॉ.एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. राष्ट्रीय ग्रंथालय दिन म्हणून साजरा करण्यात आलेल्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यशाळेत प्रा. जेवळीकर यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय संसाधनाची ओळख करून दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य एच. एस. पाटील यांनी डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचा शास्त्रोक्त पद्धतीने परिचय करून दिला. इंग्रजी विभाग प्रमुख मनोज गादेकर यांनी प्रास्ताविक, सुरेश दराडे यांनी सूत्रसंचालन, तर विक्रम सुरवसे यांनी आभार मानले. याप्रसंगी जे. पी. झाडबुके, जी. आर. काशिद, एन. आर. दणाणे, व्ही. एच. वाघमारे, एस. के. नाईकवाडी, व्ही.पी. लिंगायत, कार्यालय प्रमुख अनिल वाघमारे, विजय खताळ यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक आदी उपस्थित होते. जयंतीचे औचित्य साधून व्ही.एच. वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना अल्पोपहार दिला.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर, शुक्रवार, १८ ऑगस्ट २०१७

# झाडबुके महाविद्यालयात ग्रंथालय दिनाचा उपक्रम

प्रतिनिधी । बार्शी

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या इंग्रजी आणि ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय दिन साजरा करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांची ग्रंथालय कार्यशाळा घेण्यात आली. महाविद्यालयाच्या वाचन कक्ष येथे हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी प्राचार्य डॉ.एच.एस. पाटील, डॉ.जे.पी. झाडबुके, डॉ.जी.आर. काशीद, डॉ.एन.आर. दणाणे, डॉ.व्ही. एच. वाघमारे, डॉ.एस.के. नाईकवाड, डॉ.व्ही.पी. लिंगायत, अनिल वाघमारे, विजयकुमार खताळ आदी उपस्थित होते. ग्रंथपाल जेवळीकर यांनी ग्रंथालय संबंधी मार्गदर्शन केले. एम.बी.गादेकर यांनी प्रास्ताविक केले. सुरेश दराडे यांनी सूत्रसंचलन केले. विक्रम सुरवसे यांनी आभार मानले. श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या इंग्रजी आणि ग्रंथालय विभागातील मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. ग्रंथालय कार्यशाळेस प्रतिसाद मिळाला.

Scanned with CamScanner

लोकमत
www.lokmat.com





जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे आयोजित जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत खेळताना खेळाडू.

जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा: जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे आयोजन

# झाडबुके, सुलाखे, मंगरुळे, महाराष्ट्र विद्यालय विजयी

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर: क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत बार्शीच्या श्रीमान भाऊसाहेब झाडबुके विद्यालय, बी. पी. सुलाखे विद्यालय, महाराष्ट्र विद्यालय आणि अक्कलकोटच्या मंगरुळे प्रशालेने विजेतेपद मिळविले.

जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाद्वारा आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन मुळे हॉल येथे संघटनेचे सचिव झेड. एम. पुणेकर यांच्या हस्ते झाले. स्वागत क्रीडा शिक्षक उमेश नेवाळे यांनी केले. क्रीडा कार्यालयाचे मार्गदर्शक सत्येन जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

स्पर्धेचा निकाल: (प्रथम व द्वितीय क्रमानुसार) १९ वर्षे मुले: श्रीमान भाऊसाहेब झाडबुके विद्यालय बार्शी, एम. आय. टी. विश्वशांती ज्युनिअर कॉलेज, पंढरपूर, मुली : बी. पी. सुलाखे बार्शी, उमा महाविद्यालय, पंढरपूर. १७ वर्षे मुले: मंगरुळे प्रशाला, अक्कलकोट, विश्वशांती गुरुकुल, पंढरपूर, मुली : निरंक

१४ वर्षे मुले: महाराष्ट्र विद्यालय, बार्शी, विश्वशांती गुरुकुल, पंढरपूर, मुली: निरंक

Scanned with CamScanner

सकाळ
सोलापूर, बुधवार
१० जानेवारी २०१८

# पुरीत एनएसएस शिबिराद्वारे स्वच्छतेसह जनजागृती

## झाडबुके महाविद्यालयाच्या वतीने आयोजन

सकाळ वृत्तसेवा

वार्शी, ता. ९ : तालुक्यातील पुरी गावात श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराद्वारे गावात स्वच्छतेसह विविध विषयांवर जनजागृतीही शिबिरार्थी स्वयंसेवकांकडून करण्यात आली. विद्यार्थी स्वयंसेवकांसह गावकऱ्यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

या शिबिराचे उद्घाटन पांगरी पोलिस ठाण्याचे अधिकारी धनंजय ढोणे यांच्या हस्ते झाले. या वेळी झाडबुके महाविद्यालयाचे प्राचार्य एच. एस. पाटील, पुरीचे सरपंच अमर पवार, पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रमोद गिलविले, उपसरपंच दीपाली उपरे, उपप्राचार्या पुष्पा पाटील, एनएसएस कार्यक्रम अधिकारी एस. एम. केमदारने उपस्थित होते.

शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी गावातील गटारी तसेच रस्ते साफसफाई केली. गावकऱ्यांना विविध विषयांवर जनजागृती देखील केली. शिबिराच्या पहिल्या दिवशी मंत्रालय सहायक संचालक इर्शाद बागवान यांनी 'विकास प्रक्रियेत तरुणांचा सहभाग व सामाजिक सलोखा' या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी बागवान यांनी विद्यार्थ्यांना पोटार्थी न होता सेवार्थ भावनेने देशासाठी काम करण्याचा सल्ला दिला. तसेच शासनाच्या योजनांची माहिती देत स्वच्छता व व्यसनाधीनता विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या देशात युवकांची संख्या जास्त असून या युवाशक्तीचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी वापरून देशाच्या विकास प्रक्रियेला हातभार लावावा, असे आवाहन बागवान यांनी केले. शिबिराला संस्थेच्या अध्यक्षा प्रभाताई झाडबुके, संचालिका वर्षा ठोंबरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. या शिबिराचा समारोप गुरुवारी होणार आहे. समारोपाला गटविकास अधिकारी प्रमोद काळे प्रमुख पाहुणे असतील. अध्यक्ष म्हणून प्राचार्या पी. ए. शेख तर पांगरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष बडे, सरपंच अमर पवार प्रमुख उपस्थित असतील. शिबिरात कार्यक्रमाधिकारी के. टी. व्हनहुवे, सुरेश दराडे, प्रा. एस. आर. मुळे, शिबिरार्थी व गावकऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.



पुरी (ता. बार्शी) : येथे स्वच्छता करताना श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.

Scanned with CamScanner

शहर-जिल्हा
पुढारी
सोलापूर, गुरुवार
११ जानेवारी २०१८

# पुरीत एनएसएस शिबिराद्वारे स्वच्छतेसह जनजागृती

बार्शी : तालुका प्रतिनिधी

पुरी येथे श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराद्वारे गावात स्वच्छतेसह विविध विषयांवर जनजागृतीदेखील शिबिरार्थी स्वयंसेवकांकडून करण्यात आली. विद्यार्थी स्वयंसेवकांसह गावकऱ्यांनीदेखील या उपक्रमात सहभाग घेतला. या शिबिराचे उद्‌घाटन पांगरी पोलिस ठाण्याचे अधिकारी धनंजय ढोणे यांच्या हस्ते व झाडबुके महाविद्यालयाचे प्राचार्य एच.एस. पाटील, पुरीचे सरपंच अमर पवार, पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रमोद गिलबिले, उपसरपंच दीपाली डपरे, उपप्राचार्या पुष्पा पाटील, एनएसएस कार्यक्रम अधिकारी एस.एम. केमदारने यांच्या उपस्थित करण्यात आले.

गावातील गटारी, रस्ते यांची साफसफाई विद्यार्थ्यांनी केली. ग्रामस्थांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. शिबिराच्या पहिल्या दिवशी मंत्रालय सहायक संचालक इर्शाद बागवान यांनी 'विकास प्रक्रियेत तरुणांचा सहभाग व सामाजिक सलोखा' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी बागवान यांनी विद्यार्थ्यांना पोटार्थी न होता सेवार्थ भावनेने देशासाठी काम करण्याचा सल्ला दिला. शासनाच्या योजनांची माहिती देत स्वच्छता व व्यसनाधिनता या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या देशात युवकांची संख्या जास्त असून या युवाशक्तीचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी वापरून देशाच्या विकास प्रक्रियेला हातभार लावावा, असे आवाहन बागवान यांनी केले. दुसऱ्या दिवशी पत्रकार निलेश झालटे यांनी 'ग्रामीण असल्याचा न्यूनगंड सोडा' या विषयावर बोलताना ग्रामीण आहोत म्हणजे आपण कमजोर आहोत ही भावना तोडून टाकण्याचे आवाहन केले.

शिबिराला संस्था अध्यक्षा प्रभाताई झाडबुके, वर्षाताई ठोंबरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. या शिबिराचा समारोप गुरुवारी होणार असून समारोपाला गटविकास अधिकारी प्रमोद काळे प्रमुख पाहुणे असतील. अध्यक्ष म्हणून प्राचार्या पी.ए. शेख, तर पाहुणे म्हणून सरपंच अमर पवार हे प्रमुख उपस्थित असतील. शिबिराच्या सफलतेसाठी कार्यक्रमाधिकारी के. टी. व्हनहुवे, सुरेश दराडे, प्रा. एस. आर. मुळे यांच्यासह शिबिरार्थी व गावकरी यांचे सहकार्य लाभत आहे.



बार्शी : स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले विद्यार्थी.

Scanned with CamScanner

# श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

शिबिरातील सहभागी विद्यार्थी येथून जाताना आपल्या अंगातील पैलू उलगडून जाऊ शकणार आहेत. ग्रामीण, शहरी या संकल्पना सोडून द्याव्यात, असे प्रतिपादन वर्षाताई ठोंबरे यांनी केले. त्या पुरी (ता. बार्शी) येथे श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्या पी.ए. शेख या होत्या. यावेळी व्यासपीठावर सरपंच अमर पवार, प्राचार्य एस.एच. पाटील, प्राचार्य प्रमोद गिलबिले, उपसरपंच दीपाली उपरे, ग्रामपंचायत सदस्या महानंदा झालटे आदी मान्यवर उपस्थित होते.

वर्षाताई ठोंबरे पुढे बोलताना म्हणाल्या की, तुम्ही काय घालता, यावर तुमची बद्धीमत्ता, समाजातील मान अवलंबून राहत नाही. इंग्रजी ही साधी भाषा आहे. भाषा बोलून कोणी हुशार होत नाही, तर तुम्ही त्या भाषेचा वापर कसा व कुठे करता हे महत्त्वाचे आहे. तीन वर्षांपर्यंत दरवर्षी महाविद्यालयीन मुले येथे येऊन श्रम संस्कार शिबिर राबवणार आहोत.

पुरीचे सरपंच अमर पवार यांनी विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी गावाची निवड केल्याबद्दल आभार व्यक्त करून गाव स्वच्छता करण्यासाठी शिबिराचा खूप मोठा हातभार लागला असल्याचे सांगितले.तसेच पुढील श्रमसंस्कार शिबिरात गावातील गटारी स्वच्छ करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येऊ देणार नसल्याचेही सांगितले.

यावेळी एच.एस.पाटील, गणेश उपरे, ग्रामसेवक के.वाय.सय्यद, रेणुका रानमाळ, प्रसाद झालटे आदींनी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविकात केमदारने यांनी शिबिराचे उद्दिष्ट विषद केले. श्रमसंस्कार शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

सहभागी विद्यार्थ्यांनीही विद्यार्थ्यांच्या वतीने शिबिरासंदर्भात विचार व्यक्त केले. गावाचे सहकार्य लाभले. मार्गदर्शनामुळे गावात बदल होतोय. हे शिबिर आमच्या आयुष्यातील मोठी शिदोरी असेल, असे बोलताना सांगितले.

शिबिरात चिखर्डे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने तपासणी करण्यात आली. भगवंत रक्तपेढीच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ४५ बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रतिक्षा काशिद हीने केले. आभार एस.आर. मुळे यांनी मानले. शिबिर व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तुभाऊ झालटे, रामेश्वर झालटे, कल्याण दिडवळ, प्रवीण दिडवळ, पांडुरंग झालटे, रविंद्र पवार, शाम बसाकरे, बाबासाहेब झालटे, पांडुरंग निंबाळकर, संतोष पालके, परसराम झालटे, पांडुरंग लुंगसे, समाधान दिडवळ, बालाजी जगताप, गणेश उपरे, दिलीप पालके, मेघराज झालटे, खंडेराव झालटे यांच्यासह पुरी ग्रामस्थांनी व शिबिरातील सहभागी शिबिरार्थींनी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर, सोमवार, १५ जानेवारी २०१८

# पुरी येथील श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

प्रतिनिधी । पांगरी

तालुक्यातील पुरी येथे श्रीमान भाऊसाहेब झांडबुके महाविद्यालयाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप करण्यात आला. या वेळी वर्षा ठोंबरे, प्राचार्या पी. ए. शेख, सरपंच अमर पवार, प्राचार्य एस. एच. पाटील, प्राचार्य प्रमोद गिलबिले, उपसरपंच दीपाली उपरे, ग्रामपंचायत सदस्या महानंदा झालटे आदी उपस्थित होते.

या वेळी वर्षा ठोंबरे म्हणाल्या, इंग्रजी साधी भाषा आहे. भाषा बोलून कोणी हुशार होत नाही तर तुम्ही त्या भाषेचा वापर कसा व कुठे करता हे महत्त्वाचे आहे. तीन वर्षापर्यंत दरवर्षी महाविद्यालयीन मुले येथे येऊन श्रम संस्कार शिबिर राबवणार आहोत. सरपंच अमर पवार यांनी विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी गावाची निवड केल्याबद्दल आभार व्यक्त करून गाव स्वच्छता करण्यासाठी शिबिराचा हातभार लागल्याचे सांगितले. तसेच पुढील श्रमसंस्कार शिबिरात गावातील गटारी स्वच्छ करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येऊ देणार नसल्याचेही सांगितले.

या वेळी एच. एस. पाटील, गणेश उपरे, ग्रामसेवक के. वाय. सय्यद, रेणुका रानमाळ, प्रसाद झालटे आदींनी आपले विचार व्यक्त केले. शिबिरात चिखर्डे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने तपासणी करण्यात आली. भगवंत रक्तपेढीच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ४५ बाटल्या संकलन करण्यात आले.

Scanned with CamScanner

संचार

१० सोलापूर, गुरुवार १ फेब्रुवारी २०१८

# कुंकूलोळची टेक्नो पर्वमध्ये विजेतपदाची हॅट्ट्रिक

मागील तीन वर्षांपासून झाडबुके महाविद्यालयाच्या बी.सी.ए.बी.बी.ए. विभागाच्यावतीने टेक्नोपर्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने जनरल नॉलेज स्पर्धा, कॉम्प्युटर प्रोग्रामिंग, बेस्ट मॅनेजर, पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन, अ‍ॅडमॅड शो, टॅलेंट शो, रांगोळी, बुद्धिबळ, फेस पेंटिंग, क्रिकेट, डिबेटींग, पोस्टर प्रेझेंटेशन या स्पर्धांचा समावेश आहे.

यावर्षी स्नेहलने पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन व फेस पेंटिंग या स्पर्धात प्रथम तर बिझनेस प्लॅन, डिबेटिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. याचबरोबर पूजा कुंकूलोळ हिने बिझनेस प्लॅन व क्विझमध्ये प्रथम तर पोस्टर व पेपर प्रेझेंटेशनमध्ये व्दितीय क्रमांक मिळवला. अ‍ॅडमॅड शो



मध्ये बी.सी.ए ग्रुपने प्रथम क्रमांक मिळवला. टॅलेंट शो मध्ये अपेक्षा बेणेने प्रथम तर कृष्णा साळवे याने व्दितीय क्रमांक मिळवला. बिझनेस क्विझमध्ये पूजा कुंकूलोळ हिने प्रथम तर आदित्य ठोकडे याने व्दितीय क्रमांक मिळवला. करंट अफेर अवेयरनेस मध्ये श्रध्दा कुलकर्णी हिने प्रथम तर प्रतीक्षा नागणसूरकर हिने व्दितीय क्रमांक मिळवला. बुध्दिबळ स्पर्धेत विश्वजित जगदाळे प्रथम तर व्दितीय श्रुती देशमुखे, सी- टेस्ट मध्ये यश महंकाळे याने प्रथम तर वैष्णवी मुंदडा हिने व्दितीय क्रमांक मिळवला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर विद्यापीठाचे डॉ.आर.एस.मेंते यांच्या हस्ते व वर्षा ठोंबरे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी प्राचार्य डॉ.पाटील, संगणक विभाग प्रमुख प्रा.सुनील नष्टे उपस्थित होते.

Scanned with CamScanner

## इंग्लंडमधील मँचेस्टर फ्यूजन टेनिस स्पर्धा: महिला दुहेरीतील कामगिरी

# प्रार्थनाने जिंकले १ लाख अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस

भ.के.गव्हाणे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

बार्शी : इंटरनॅशनल टेनिस फेडरेशनच्या वतीने इंग्लंडमधील मँचेस्टर शहरातील ग्रास कोर्टवर झालेल्या मँचेस्टर फ्यूजन १ लाख अमेरिकन डॉलर्स बक्षिसाच्या स्पर्धेत भारताची टेनिसस्टार आणि बार्शीची सुपुत्री प्रार्थना गुलाबराव ठोंबरे हिने महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावले. या विजयासह प्रार्थनाने महिला दुहेरीतील १ लाख अमेरिकन डॉलर्सचा किताब तिच्या टेनिस कारकिर्दीमध्ये प्रथमच जिंकला आहे. या विजेतेपदामुळे टेनिसपटू प्रार्थना ठोंबरेच्या जागतिक क्रमवारीत १४० गुणांची भर पडणार असून, तिचे मानांकन १५० च्या आत येणार आहे.

रविवारी झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात भारताच्या प्रार्थनाने थायलंडची सहकारी खेळाडू लकासिका कुमकुम हिच्या मदतीने प्रतिस्पर्धी ब्रिटनची नयनी ब्रेंडी व अमेरिकेची आशिया मोहमंद यांचा ७-५,६-३ असा सलग दोन सेटमध्ये विजय मिळवत त्यांचा पराभव केला.तत्पूर्वी उपांत्य फेरीत प्रार्थना व लकासिका कुमकुम या जोडीने इंग्लंडच्या डार्ट व ड्यूम या जोडीचा ट्रायबेकरच्या साहायाने मात करीत अंतिम फेरीत प्रवेश केला होता.


इंग्लंड येथे मँचेस्टर फ्यूजन १ लाख अमेरिकन डॉलर्स बक्षिसाच्या टेनिस स्पर्धेतील मानाचा किताब मिळविल्यानंतर विजेतेपदाच्या ट्रॉफीसह प्रार्थना ठोंबरे व तिची जोडीदार खेळाडू कुमकुम आदी.

प्रार्थनाने यापूर्वी १०,१५,२५ व ६० हजार अमेरिकन डॉलर्सच्या स्पर्धा जिंकल्या होत्या. प्रथमच तिने १ लाख अमेरिकन डॉलर्सची स्पर्धा जिंकली आहे. यापूर्वी प्रार्थनाने दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेच्यावेळी सानिया मिर्झासोबत खेळताना सुवर्णपदक तर आशियाई स्पर्धेत कांस्यपदक मिळविले होते. शिवाय २०१४ मध्ये दक्षिण कोरियात झालेल्या १७ व्या आशियाई स्पर्धेतील दुहेरीत ब्रांझपदक, २०१६ मधील दक्षिण आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक तर मिश्र दुहेरीत रौप्यपदक पटकाविले होते. २०१४ ते २०१६ सलग तीन वर्षे फेडकप स्पर्धेसाठी तिने भारतीय संघात स्थान मिळविले होते. २०१६ च्या रिओ ऑलिम्पिक स्पर्धेत टेनिस संघातून सानियासोबत भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

Scanned with CamScanner

दिव्य मराठी - मंगळवार - 19 जून 2018 - पान नं - 10

मँचेस्टर फ्युजन एक लाख अमेरिकन डॉलर स्पर्धेचे विजेतेपद

# प्रार्थनाला इंग्लंडमध्ये दुहेरीचे ज़ेतेपद

प्रतिनिधी । बार्शी

आईटीएफच्या वतीने इंग्लंड मधील मँचेस्टर शहरात पार पडलेल्या ग्रास कोर्टवरील मँचेस्टर फ्युजन एक लाख अमेरिकन डॉलर स्पर्धेत भारताची टेनिसपटू प्रार्थना ठोंबरे हिने महिला दुहेरीत थायलंडची लुकसिका कुमखुम हिच्या सोबतीने विजेतेपद मिळवले. प्रार्थनाने महिला दुहेरीत एक लाख अमेरिकन डॉलर्सचा कित्ताब प्रथमच जिंकला आहे. प्रार्थनाने दुहेरीचे या सिझनमधील पहिले तर



कारकिर्दीतील एकूण २१ वे टायटल जिंकले. अंतिम सामन्यात प्रार्थना हिने थायलंडच्या सहकारी खेळाडू लुकासिका कुमखुम हिच्या साथीने प्रतिस्पर्धी ब्रिटनची नयमी ब्रॉडी व अमेरिकेची आशिया मोहम्मद यांचा ७-६(५) व ६-३ असा सरळ सेट मध्ये पराभव केला.

Scanned with CamScanner

# प्रार्थना ठोंबरेने इंग्लंडमध्ये जिंकली एक लाख अमेरिकन डॉलर्सची स्पर्धा

## जागतिक मानांकनात १४० गुणांची भर

**संचार प्रतिनिधी**

**बार्शी,** दि. १८- भारताची टेनिसस्टार प्रार्थना ठोंबरे हिने रविवारी इंग्लंड येथे झालेल्या स्पर्धेत महिला दुहेरीचे विजेतेपद मिळवले. आयटीएफच्यावतीने इंग्लंडमधील मँचेस्टर शहरात पार पडलेल्या ग्रास कोर्टवरील मँचेस्टर फ्युजन १ लाख अमेरिकन डॉलर्स स्पर्धेत प्रार्थनाने हे विजेतेपद पटकावले.

या विजेतेपदामुळे प्रार्थनाच्या दुहेरीतील जागतिक क्रमवारीत १४० गुणांनी भर पडणार असून तिचे मानांकन १५० च्या आत येणार आहे. प्रार्थनाने महिला दुहेरीतील १ लाख अमेरिकन डॉलर्सचा किताब तिच्या टेनिस करिअरमध्ये प्रथमच जिंकला आहे. रविवारी पार पडलेल्या स्पर्धेच्या अंतिम सामान्यात भारताची प्रार्थना हिने थायलंडच्या सहकारी खेळाडू लकासिका कुमकुम हिच्या साथीने प्रतिस्पर्धी ब्रिटनची नयनी ब्रेंडी व अमेरिकेची आशिया मोहम्मद यांचा ७-५, ६-३ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. तत्पूर्वी उपान्त्य फेरीत प्रार्थना व कुमकुम या जोडीने इंग्लंडच्या डार्ट व ड्युम या जोडीचा ट्रायब्रेकरच्या साहाय्याने मात करत अंतिम फेरीत गाठली होती. यापूर्वी प्रार्थनाने १०, १५, २५ व ६० हजार अमेरिकन डॉलर्सच्या स्पर्धा जिंकल्या आहेत. प्रथमच तिने १ लाख अमेरिकन डॉलर्सची स्पर्धा जिंकली आहे. १ लाख अमेरिकन डॉलर्सची स्पर्धा जिंकल्यानंतर तिच्या दुहेरीच्या गुणांकनात १४० गुणांची भर पडली आहे.

यापूर्वी प्रार्थनाने दक्षिण आशियाई स्पर्धेत सानिया मिर्झासोबत खेळताना सुवर्णपदक तर आशियाई स्पर्धेत खेळताना कांस्यपदक मिळवले आहे. २०१४ मध्ये दक्षिण कोरियात पार पडलेल्या १७ व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत दुहेरीत ब्रांझपदक, २०१६ मध्ये दक्षिण आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक तर मिश्र दुहेरीत रौप्यपदक मिळवले आहे. तसेच फेड कप स्पर्धेसाठी २०१४ ते १६ सलग तीन वर्षे भारतीय संघात स्थान मिळवले आहे. २०१६ मध्ये पार पडलेल्या रिओ ऑलिम्पिक स्पर्धेत टेनिस संघात भारतीय संघाचे सानिया मिर्झासोबत प्रतिनिधित्व केले. प्रार्थना ठोंबरेचा सोमवारी वाढदिवस होता. वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला प्रार्थनाने महिला दुहेरीत प्रथमच १ लाख अमेरिकन डॉलर्सची मानाची स्पर्धा जिंकत चाहत्यांना वाढदिवसाची अनोखी भेट दिली असल्याचे तिची आई वर्षा ठोंबरे व वडील गुलाबराव ठोंबरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



**बार्शी :** इंग्लंडमध्ये झालेल्या मँचेस्टर फ्युजन १ लाख अमेरिकन डॉलर्सच्या स्पर्धेतील मानाचा किताब मिळविल्यानंतर विजेतपदाच्या ट्रॉफीसह प्रार्थना व तिची सहकारी खेळाडू कुमकुम.

पेज नं-2 संचार-मंगळवार- 19 जून 2018

Scanned with CamScanner